|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ अंक : ११ सोमवार दि. ०४ मार्च २०२४ ते रविवार दि. १० मार्च २०२४ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## माय-लेकाचे नाते रक्तरंजित ठरले दारूसाठी मुलाने आईला ठार मारले

अमरावती/क्राईम रिपोर्टर

ज्या मुलाला ९ महिने उदरात वाढवले. काबाडकष्ट करून शिक्षण दिले त्याच माऊलीला एका नराधम पुत्राने केवळ दारूसाठी पैसे दिले नाहीत म्हणून ठार मारल्याची संतापजनक घटना अमरावतीच्या भोकारबर्डीमध्ये घडली आहे. या प्रकरणी धरणी पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून आरोपी मुलाला फासावर लटकवण्याची मागणी केली जात आहे. सीताबर्डीमध्ये गंगाबाई मोतीराम जांबेकर हि महिला आपल्या मुलासह राहत असे. मात्र तिचा मुलगा पवन ...पान २ वर

# पालघर पुन्हा एकदा दुहेरी हत्याकांडाने हादरले दोन निरपराध वयोवृद्धांना कोणी ठार मारले?

पालघर/क्राईम रिपोर्टर

सध्याच्या विज्ञान युगातला माणूस प्रगतशील आणि अत्यंत बुद्धीजीवी म्हणून ओळखला जातो. माणसाने आपल्या बुद्धीच्या जोरावर नवनवे प्रयोग करून विकासाला विज्ञानाची जोड देत वेगवेगळी क्षेत्र पदक्रांत केलीत. चंद्रासारख्या परग्रहावर पाऊल ठेवण्या इतपत माणसाची प्रगती झालेली आहे. मात्र एकीकडे माणूस प्रगती करीत असतानाच त्याच्यात विकृतीही निर्माण होतेय आणि हि विकृती त्याला कधी कधी निसर्ग नियमाच्या विरुद्ध वागायला लावतेय. माणसाच्या मनात विचारांचे वादळ उठले कि त्याचे स्वत:वर नियंत्रण रहात नाही. जगात अशी कितीतरी हत्याकांड घडलेली आहेत जी वेलएज्युकेटेड लोकांच्या हातून घडली आहेत. अशांना समाजाने जर मनोरुग्ण ठरवले तर न्यायपालिका सुद्धा त्याला त्याच दृष्टीकोनातून बघते. पण एक माणूस दुसऱ्या माणसाचा जीव घेण्या इतपत क्रूर का बनतो? याचे ठोस उत्तर मनोवैज्ञानिकानाही सापडलेले नाही. कारण प्रत्येक हत्येच्या घटनेची कारणे वेगवेगळी असतात. आरोपींची मानसिकता वेगवेगळी असते. मात्र यात एकाच गोष्ट सत्य असते आणि ती म्हणजे अशी माणसे समाजासाठी धोकादायक असतात. खास करून ज्यांच्या पासून माणसाला धोका नाही अशा लहान मुलांची किंवा वृद्ध व्यक्तींच्या हत्या करणारे केवळ मनोरुग्णाच असू शकतात. पालघर नजीकच्या कुडन मध्ये ८० आणि ८५ वय असलेल्या दोन वृद्धांची हत्या करण्यात आलीय. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. मात्र तो माथेफिरू किंवा मनोरुग्ण असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तसेच सदर आरोपी कोणतीही माहिती देत नसल्याचे पोलिसांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे या हत्याकांडाचे गूढ वाढले आहे. ज्यांची हत्या झाली त्या व्यक्ती आरोपीच्या ओळखीच्या असतील आणि त्यांच्या सोबत त्याचे पूर्ववैमन्यस्य असेल तर या दुहेरी हत्याकांडाचे निश्चितपणे काहीतरी कारण असेल आणि तसे असेल तर आरोपी मनोरुग्ण किंवा माथेफिरू आहे असे म्हणता येणार नाही. पण या हत्या पूर्व वैमन्यास्यातून झालेल्या नसतील आणि आरोपीसाठी मयत अनोळखील असतील तर मात्र आरोपी मनोरुग्ण असावा. पण पोलिसांना जर अजून पर्यंत या गुन्ह्याचे कारण किंवा आरोपीची संपूर्ण माहिती शोधून काढण्यात अपयश आले असेल तर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकते.



पालघरमध्ये अत्यंत निर्घृणपणे दोन जेष्ठ नागरिकांची हत्या केल्याची धक्कादायक घटना कुडण येथे घडली असून हत्या करून आरोपी फरार झाला. त्यानंतर आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली. दलदल परिसरात लपून बसलेल्या या आरोपीला अवघ्या काही तासातच पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने अटक केली. पालघर तालुक्यातील कुडण येथे एका अज्ञात इसमाने दोन जेष्ठ नागरिकांवर हल्ला करून निर्घृणपणे त्यांची हत्या केली. भीमराव पाटील (वय ८०) आणि मुकुंद पाटील (वय ८५) या दोघांवर कुदळीने वार करून दोघांचेही चेहरे विद्रूप करत अत्यंत निर्घृणपणे हत्या केली. त्यानंतर बाजूला असलेल्या एका घरावर देखील या हल्लेखोराने हल्ला केला. त्यानंतर हा हल्लेखोर अंधाराचा फायदा घेत पसार



झाला. गुरुवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली असून या संपूर्ण घटनेनंतर परिसरात भीतीच्या वातावरण पसरले आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक तारापूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. उपविभागीय पोलिस अधिकारी विकास नाईक यांनी देखील घटनास्थळी भेट दिली. आरोपीचा शोध घेण्यासाठी तातडीने ...पान ६ वर

# पती तुरुंगात जाताच ड्रायव्हरशी जुळले प्रेम बिल्डरच्या पत्नीने अखेर पतीचा केला गेम





नवी मुंबई/एस.कुमार

**काही महिला अशा असतात कि त्या पुरुषाच्या सावसाशिवाय राहू शकत नाहीत. अशावेळी काही कारणास्तव जर पतीच्या सहवासापासून पत्नी दूर राहिली तर पत्नीचा तोल जावू शकतो ती दुसऱ्याच्या प्रेमात पडू शकते. नवी मुंबईतील अशाच एका घटनेत एका बिल्डरला फसवणुकीच्या आरोपाखाली तुरुंगवास झाला होता. मात्र तो तुरुंगात असताना त्याच्या पत्नीचे ड्रायव्हरशी अनैतिक संबंध जुळले. यावेळी बिल्डरच्या पत्नीने ड्रायव्हरला हाताशी धरून बिल्डरची संपती हडपण्यासाठी बिल्डरची हत्या घडवून आणली. या प्रकरणी आरोपी पत्नी व ड्रायव्हरला अटक करण्यात आली आहे आणि या घटनेचा संपूर्ण तपास करीत आहेत.**

दि.१४ जानेवारी २०२४ रोजी नवी मुंबईच्या सीवूड सेक्टर-४४ येथील अमन बिल्डर या बांधकाम व्यावसायिकाच्या कार्यालयात काम करणाऱ्या दोन मुली सकाळी ११ वाजताच्या सुमारास कार्यलयालत आल्या असता, त्यांना धक्का बसला. कार्यालयात त्यांचा मालक बांधकाम व्यावसायिक मनोजकुमार सिंह (वय ३९) यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेले बघून त्या दोघींही भरभरून घाम फुटला.त्यांनी लगेच या घटनेची माहिती एनआरआय पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच लगेच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन मृतदेहाचा व घटनास्थळचा पंचनामा केला.बांधकाम व्यावसायिक मनोज सिंह यांच्या डोक्यात सळईने प्रहार घालून त्यांना ठार मारण्यात आले होते. ही खळबळजनक घटना उघडकीस आल्यानंतर संपूर्ण शहरात खळबळ माजली होती. दरम्यान कोणीतरी पूर्व वैमनस्यतून ही हत्या केली असावी असा कयास बांधून पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. बांधकाम व्यावसायिक मनोज सिंह याची हत्या त्याच्या जवळच्याच व्यक्तीनं केल्याचा संशय त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केला. त्यामुळे पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून मारेकऱ्याचा शोध सुरू केला. दरम्यान, बांधकाम व्यावसायिक मनोज सिंह यांच्यावर फसवणूक केल्याचे तीन गुन्हे आधीपासूनच दाखल होते. यातून तर ही हत्या झाली नाही ना? असा संशय व्यक्त करण्यात येत होता. त्यादृष्टीने पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास ...पान २ वर

# अनैतिक संबंधाला पतीने विरोध झाला लाखोंची सुपारी देऊन पत्नीने गेम केला



उल्हासनगर/क्राईम रिपोर्टर

**अनैतिक संबंध फार काळ लपून राहत नाही. मात्र एखादी विवाहिता किंवा विवाहित पुरुष अनैतिक संबंधात अडकलेला असेल तर समाजाच्या भीतीने किंवा आपले अनैतिक संबंध टिकवण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. उल्हासनगरमध्ये अशाच एका विवाहित महिलेने आपल्या अनैतिक संबंधात अडथळा ठरणाऱ्या पतीचा काटा काढण्यासाठी चक्क तीस लाख रुपयांची सुपारी दिली आणि पतीचा गेम केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी महिलेला आणि सुपारी किलरला अटक केली असून त्या महिलेचा प्रियकर फरारी आहे.**

पत्नीने प्रियकराच्या मदतीने ३० लाख रुपयांची सुपारी देऊन पतीची हत्या घडवून आणल्याचा पर्दाफाश ...पान ६ वर

# जमिनीच्या वादातून पुतण्याचे डोके फिरले रागाच्या भरात त्याने चुलतीला ठार मारले

चिपळुण/क्राईम रिपोर्टर

**जमिनीचे वाद माणसाला नातीगोती विसरायला लावतात आणि ग्रामीण भागात शेती हेच उत्पनाचे मुख्य साधन असल्याने कोणी आपल्या मालकीची एक इंचही जमीन सोडत नाही किंवा आपल्या मालकीच्या जमिनीत कुणालाही घुसखोरी करायला देत नाही. चिपळूण जवळच्या वालोपेवाडी येथील प्रकाश हर्चिलकर याचा त्याच्या चुल्तीशी जमिनीवरून वाद सुरु होता. याच वादातून प्रकाशने चुलतीला ठार मारून तिचा मृतदेह शेतात जाळला. या प्रकरणी पोलिसांनी प्रकाशला अटक केली आहे.**





वालोपेवाडी वरचेवाडी येथे लक्ष्मीबाई हर्चिलकर आणि त्याचा पुतण्या प्रकाश हर्चिलकर यांचा शेतातील सामायीक जमीनीवरून वाद सुरू होता. बऱ्याचवेळेला या वादातून त्याचा पुतण्या प्रकाश बरोबर वाद विवाद आणि भांडणे ही झाली होती. काही केल्या हा वाद मिटत नव्हता. आपल्या हक्काची शेतातील सामायीक जमीन ही लक्ष्मीबाई याच्या हद्दीत गेली असल्याचे मत प्रकाश हर्चिलकर याचे होते. तुम्ही माझ्या शेतजमीनीत घुसला आहे त्यामुळे तो त्यांच्या बरोबर वाद घालत होता. परंतु लक्ष्मीबाई या त्याचे काही एक म्हणणे ऐकत नव्हत्या. माझी जमीन ही माझ्या हद्दीत आहे. उलट तुच माझ्या शेत जमीनीत घुसला आहेस असे म्हणून त्या त्याचे काही एक चालू देत नव्हत्या. या कारणातून दोन कुटूंबात भांडणे होत असताना प्रकाश याच्या बायकोने मागे एकदा लक्ष्मीबाई हिला मारहाण केली होती. ...पान २ वर

# वसुलीच्या तगाद्यामुळे रमेश हैराण झाला उधारीच्या वादातून सोनाराचा जीव गेला

कोल्हापूर (चंदगड)/क्राईम रिपोर्टर



मयत बाळकृष्ण

**कोल्हापूर उधारीचा व्यवहार जर लवकर मिटवला नाही तर तो एखाद्याच्या जीवावरही बेतू शकतो. कारण त्यातून संबंध तर बिघडतात, पण सुडाची भावना निर्माण होऊन एखाद्याचा जीवही जावू शकतो. चंदगड जवळील कालकुंद्री येथील एका सोनाराने लग्नासाठी रमेश पाटील नावाच्या इसमाला उधारीवर दागिने दिले होते. पण बराच कालावधी लोटला तरी तो पैसे देत नव्हता. त्यामुळे उधारीच्या पैशासाठी सोनाराने रमेशच्या मागे तगडा लावला होता. चार चौघात त्याचा अपमान केला होता. त्यामुळे रमेश पाटील याने संधी साधून उधारीचे पैसे देण्याच्या बहाण्याने निर्जनस्थळी नेले व त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

चंदगड जवळील कालकुंद्री येथे बाळकृष्ण सोनार हे आपली पत्नी मुलासह राहयला आहेत. ते गेल्या काही वर्षापासून पाटबंधारे विभागात नोकरीस असून नोकरी करता करता आपला पुर्वजाचा व्यवसाय म्हणून ते सोनार कामाकडे वळाले होते. ते सोन्या चांदीचे दागिणे कला कुसरीने बनवून आपल्या भागात विकत ...पान २ वर

# प्रियकराच्या डोक्यात प्रेयसीचे विचार साचले पत्नीचा अडसर येताच दगडाने डोके ठेचले


बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



मयत गंगाबाई

**काही लोकांना घरातील रोज घरातील भाजी भाकरी खाऊन कंटाळा आलेला असतो असे लोक मग उकिरडे हिंडत फिरतात. अशा वेळी जर कोणी त्यांच्या गळाला लागली कि मग तिच्या आहारी जावून घरच्या लक्ष्मीला विसरतात. पोराबाळांकडे दुर्लक्ष करतात. त्यांच्या डोक्यात फक्त आणि फक्त प्रेयसी व तिच्याकडून मिळणारे शरीर सुख याचाच विचार असतो. नांदुरा तालुक्यातील वडनेरभोलजी गावातील नितीनचे सुद्धा असेच झाले होते. घरात पत्नी आणि दोन मुले असताना तो गावातील दुसऱ्या बाईच्या नादाला लागला. त्यामुळे घरात वाद होऊ लागले. याच वादातून त्याने आपल्या अनैतिक संबंधाच्या आड येणाऱ्या पत्नीचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी नितीनला अटक केली आहे.**

नांदुरा तालुक्यातील वडनेरभोलजी गावात नितीन एकनाथ कळसकार हा पत्नी, एक मुलगा व एक मुलगी, म्हातारी आईसह रहात होता. नितीनकडे साडेतीन एकर शेती होती, तसेच त्याने चुलत भावाची २ एकर शेती बटाईने केली होती. शेतीच्या उत्पन्नावर नितीन आपल्या कुटुंबाचा प्रपंच चालवत होता. घरच्या शेतीमध्ये त्याने गह आणि हरभरा पेरला असून, बटाईने केलेल्या शेतात कपाशी लावली होती. मोठा मुलगा आदित्य बीसीएचे शिक्षण घेतो तर मुलगी गावातील शाळेत शिक्षण घेत आहे. सुखी संसार असतांना नितीनला अवदसा आठवली. घरात सुस्वभावी बायको असतांना गावातील एका महिलेसोबत नितीनचे सूत जुळले. त्या



आरोपी नितीन

महिलेसोबत नितीनची मैत्री गावभर झाली. पत्नी गंगाला पतीचे प्रेमचाळे समजल्याने ती चांगलीच खवळली. तिने पतीची चांगलीच खरडपट्टी काढली, मात्र त्या महिलेच्या प्रेमात वेडा झालेला नितीन पत्नीचे ऐकत नव्हता. नितीनच्या बाहेरख्याली पणामुळे त्याच्या घरातील शांतता भंग होऊन नेहमी कटकटी होऊ लागल्या. नेहमीच्या या कटकटीतून सुटका मिळवण्यासाठी व अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या गंगाचा आवाज कायमचा बंद करण्याची योजना नितीनच्या डोक्यात जन्म घेत होती, तर नवऱ्याचे प्रताप आपल्या माहेरी सांगण्याची वाटगंगा पहात होती. दि. १५ जानेवारीला ...पान २ वर

# अनैतिक संबंधात शरीर सुखाचा मोह वाढला प्रियकराच्या मदतीने पतीचाच काटा काढला

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर

**पतीला दारूचे व्यसन असले कि त्याच्या याच व्यसनाचे पत्नी भांडवल करते आणि पर पुरुषाबरोबर संबंध जुळवते. मात्र अनैतिक संबंधाचा शेवट भयानक असतो. वास्तविक पती व्यसनी असेल तर पत्नीने त्याचे व्यसन सोडवण्याचा प्रयत्न करायला हवा. पण तसे न करता दुसऱ्याच्या फंदात पडल्यावर पतीलाच मार्गातून हटवण्याचा प्रयत्न करतात आणि पकडल्या गेल्यावर तुरुंगात जावून बसतात. अशा वेळी पतीही गेला संसारही गेला आणि प्रियकरही गेला अशी त्यांची हालत होते. श्रीगोंदा तालुक्यातील कोथूळगाव येथील आरतीचेही तसेच झाले. पती दारू पितो म्हणून आरतीने दुसऱ्याशी अनैतिक संबंध जुळवले आणि प्रियकराच्या मदतीने पतीची सुपारी देऊन काटा काढला, पण पोलिसांनी या हत्याकांडाचा पर्दाफाश करून सर्व आरोपींना ताब्यात घेतले.**

अहमदनगर जिल्ह्याच्या श्रीगोंदा तालुक्यातील कोथुळगावातील एका घरात मध्यरात्रीच्या काळोखात अज्ञात इसम शिरले. काही समजण्याआधीच त्यांनी घरातील कर्ता पुरूष योगेश सुभाष शेळके हे झोपेत असतांना त्यांच्या गळ्यावर, हातावर तसेच उजव्या पायावर कोयत्याने गंभीर वार करून त्यांना ठार केले. तसेच त्यांची बायको आरती शेळके यांच्याही गळ्यास कोयता लावला. 'ओरडलीस तर मारून टाकीन' अशी धमकी दिली. आधीच योगेशला त्यांनी ठार मारले होते. त्यानंतर त्याच्या बायकोला धमकी देवून ते सर्वजण निघून गेले. घरातील लोकांचा आरडाओरडा ऐकून लोक जमा झाले होते. त्यांनी या घटनेची माहिती बेलवंडी पोलिसांना दिली. शेळके यांच्या घरातील कर्ती व्यक्ती मृत्यूमुखी पडल्यामुळे कोथुळ गावासह श्रीगोंदा तालुका हादरला होता. का झाला असेल हा खून? घरात घूसून केवळ कर्त्या पुरूषांलाच ठार मारून मारेकरी गेले, त्यांनी इतरांना मात्र हातही लावला ...पान २ वर



आरोपी रोहित



आरोपी आरती

04 TO 10 MARCH 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 3/2/2024 9:50 PM Page 1



पान ३ वरून...

## माय लेकाचे नाते रक्तरंजित ...

किशोर जांबेकर याला दारूचे व्यसन होते. कामधंदा न करता सतत दारू पिणे आणि दारूसाठी आईकडे पैसे मागणे एवढेच तो करायचा. त्यामुळे गंगाबाई त्याच्या त्रासाला कंटाळली होती. याच दरम्यान सरकारी योजनेतून गंगाबीला काही पैसे मिळाले होते. मात्र हि माहिती पवनला समजताच तो आईकडे पैसे मागू लागला, पैशासाठी तिच्याशी भांडण करू लागला. त्यावरून घरात दोघांची भांडणे होऊ लागली. त्यांच्या या भांडणाला शेजारीही वैतागले होते. गुरुवारी असेच दोघांचे भांडण झाले. या भांडणात चिडलेल्या पवनकुमारने रागाच्या भारत लाकडी दांडक्याचे जोरदार प्रहार आईच्या डोक्यावर केले, यात तिचा जागीच मृत्यू झाला. आईला ठार मारून पवन पळून गेला. दरम्यान या हत्येची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला. तसेच काही तासातच आरोपी मुलाला अटक केली.

## पती तुरुंगात जाताच ड्रायव्हरशी ...

सुरू होता. मात्र मागील काही दिवसांपासून मनोज सिंग आणि त्यांची पत्नी पूनमसिंहचे पटत नव्हते. अशी माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी बांधकाम व्यावसायिक मनोज सिंह यांनी पत्नी पूनमसिंह यांच्या बद्दल माहिती मिळवली. तेव्हा पत्नी पूनमसिंह व वाहन चालक राजू उर्फ शमसूल अबुहुरैरा खान (वय २२) यांच्यात प्रेम संबंध असल्याची माहीत प्राप्त झाली. दोघांचे सीडीआर तपासण्यात आले. त्यानंतर ही हत्या या दोघांनीच केल्याचं समोर आलं. पोलिसांनी राजू उर्फ शमसूल अबुहुरैरा खान याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्याला धारेवर धरले असता, त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली.नवी मुंबईच्या उलवे येथे मनोज सिंग हा आपली पत्नी पूनम सिंगसह राहत होता. मनोज सिंग याचे सीवूड सेक्टर-४४ येथे अमन बिल्डर नावांचे कार्यलय आहे. या कार्यलयात दोन मुली काम करतात. घरखरेदीसाठी बरीच मंडळी या कार्यलयात येऊन बुकिंग करतात.मात्र काही वर्षापूर्वी फसवणूक प्रकरणी मनोज सिंग याला अटक करण्यात आली होती. चार महिने ते कारागृहात होते. या कालावधीत मनोज सिंह यांनी पत्नी व वाहन चालक आणि पडेल ते काम करणारा खान यांच्यात जवळीक निर्माण झाली. दोघांचे प्रेमसंबंध सुरू झाले. तुरुंगातून सुटल्यावर पूनम सिंग आणि मनोज यांचे पटत नव्हते. त्यात खान सोबत पुनमचे प्रेम संबंध असल्याने मनोज सिंग यांची हत्या करून पूर्ण मालमत्ता आपल्याला मिळेल या विचाराने सिंग यांची पत्नी आणि खान या दोघांनी मनोज सिंग यांच्या हत्येचा बेत आखला. तो बेत तडीस नेण्याचा निर्धार पक्का झाला. ठरल्याप्रमाणे पूनम सिंह आणि राजू खान यांच्या फोनवरून याबाबत बोलणे झाले.दुर्दैवाने शुक्रवारी दि.१३ जानेवारी रोजी मनोज सिंह हे सीवूड्स सेक्टर ४४ मधील अमन बिल्डर्स या कार्यालयात बसले होते. मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास राजु तेथे आला .खाणे पिणे झाल्यावर अतिशय थंड डोक्याने विचार करून राजुने मनोजकुमार सिंग याच्या डोक्यात लोखंडी रॉडने जोरदार प्रहार केले .डोक्याला मार लागल्याने मनोज सिंह यांचा या हल्लयात मृत्यू झाला. त्यानंतर राजू खान हा घटनास्थळवरून पळून गेला. दुसऱ्या दिवशी अमन बिल्डर या बांधकाम व्यावसायिकाच्या कार्यालयात काम करणाऱ्या दोन मुली सकाळी ११ वाजताच्या सुमारास कार्यलयालत आल्या असता, मनोजकुमार सिंह हे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले. एनआरआय पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन गुन्हयाचा तपास हाती घेतला आणि अगदी चोवीस तासांच्या आत गुन्ह्यातील संशयित आरोपी राजू उर्फ शमसूल अबुहुरैरा खान (२२) याच्यासोबत बांधकाम व्यावसायिकाची पत्नी पुनम सिंह (३४) या दोघांना अटक करण्यात आली आहे.

## अनैतिक संबंधाला पतीने विरोध ...

उल्हासनगर गुन्हे अन्वेषण शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू सोनवणे यांनी केला आहे. पोलिसांनी दिल्लीतील निझामुद्दीन रेल्वे स्थानकावर सापळा रचून फिल्मी स्टाईलने सुपारीबाज आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून पत्नीला अंबरनाथच्या राहत्या फ्लॅटमधून ताब्यात घेण्यात आले आहे. तर प्रियकर फरार झाला आहे. अंबरनाथमध्ये पत्नी सुमन झा व मुलांसोबत राहणारा ४६ वर्षीय रमेश झा हा येथील एका फार्मा कंपनीत काम करत होता. अशातच २५ फेब्रुवारीच्या रात्री साडेनऊ ते पावणे दहा वाजण्याच्या सुमारास रमेश झा याचा मृतदेह अंबरनाथ-बदलापूर रोडवरील पेट्रोलपंप जवळ मिळून आला होता. त्याची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली होती. या घटनेची माहिती मिळताच अंबरनाथ पोलीस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शव विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला होता. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यावर या गुन्ह्याचा समांतर तपास उल्हासनगर गुन्हे अन्वेषण शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आला होता. अखेर सीसीटीव्ही फुटेज व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी हे दिल्लीत पळून जात असल्याचे उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पोलिसांना समजले. तेव्हा ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू सोनावणे, पोलीस राजेंद्र थोरवे, गणेश गावडे, चंद्रकांत पाटील यांनी २७ तारखेला दिल्ली गाठून निजामुद्दीन रेल्वे स्थानकात फिल्मी स्टाईलने सापळा रचून दीपककुमार शहा आणि संतोष गुप्ता यांच्या मुसक्या आवळल्या. रमेश झा यांच्या हत्येत त्याची पत्नी सुमन झा हिचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यावर २८ तारखेला सुमन झा हिला अंबरनाथ मधील राहत्या फ्लॅटमधून महिला पोलीस नाईक कुसुम शिंदे, महिला पोलीस शिपाई मनोरमा साळवे यांनी ताब्यात घेतले. या प्रकरणातील प्रियकर हा फरार असून त्याचे नाव गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहे. पुढील तपासासाठी आरोपींना अंबरनाथ पोलिसांच्या सुपूर्द करण्यात आल्याची माहिती गुन्हे अन्वेषण शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू सोनवणे यांनी दिली.

## जमिनीच्या वादातून पुतण्याचे ...

त्यामुळे लक्ष्मीबाई यांनी त्यावेळी तिच्या विरोधात पोलीस तक्रार दाखल केली. परंतु त्यावेळी हा वाद पोलीस स्टेशनबाहेर मिटल्याने तो वाद तिथल्या तेथे मिटला होता. आपल्या बायकोच्या विरोधात लक्ष्मीबाई यांनी पोलीसात तक्रार दाखल केल्याने प्रकाश हा त्याचेवर चिडला होता.दिवसामागून दिवस जात होते. परंतु सामायीक शेत जमीनीचा वाद काही केल्या मिटत नव्हता. अधून मधून त्याचेत वाद आणि भांडणे होत होती.मागे एकदा झालेल्या भांडणात लक्ष्मीबाई हिला प्रकाश याने तुला आता जिवंतच ठेवीत नाही अशी धमकी ही दिली होती.त्यावेळी लक्ष्मीबाई याच्या मुलग्याने प्रकाश याच्याशी वाद घालत त्याला मारहाण केली.वालोपेवाडी येथील मंडळीनी ही त्याचा वाद मिटविण्याचा प्रयत्न केला परंतु प्रकाश हर्चिलकर हा काही केल्या कोणाचे ऐकत नव्हता.त्यामुळे हा वाद मिटण्याऐवजी वाढतच चालला होता.प्रकाश हा आपल्या हद्दीत लक्ष्मीबाई आणि त्याच्या चुलत भावाला पाय ठेवू देत नव्हता.त्यातून बऱ्याच वेळेला लक्ष्मीबाई या दांडगाव्याने ही आपलीच हद्द आहे असे सांगून तेथे जात येत होत्या. लक्ष्मीबाई याचा दांडगावा प्रकाशला खपत नव्हता.तो तिच्यावर चिडून तिला शिवीगाळ करीत माझ्या हद्दीत पाय ठेवू नकोस असे सांगत होता. कोण कोणाचे ऐकत नव्हते. प्रकाश याच्या मनात दुहेरी राग होता. तो त्याच्यावर चिडूनच असल्याने कधी एकदा म्हातारीचा घात करतो असे त्याला झाले होते. त्यातच त्याचा रागीट स्वभाव त्याला गप्प बसु देत नव्हता. तो काही ना काही कुरापती करीत होता. लक्ष्मीबाई याच्या शेतात लिंबु टाक, हळद-कुंकू टाक असे करीत होता. हे सगळे प्रकार लक्ष्मीबाई आणि त्याचा मुलगा यांना माहित होते. तरी ही ते गप्प बसत होते. लक्ष्मीबाई या भक्तीमार्गातील आणि अध्यात्मिक क्षेत्रातील असल्याने त्याचा त्यावर विश्वास नव्हता. सध्या माघ महिना चालू असल्याने पंढरपुर येथे माघी वारी आणि यात्रा चालू आहे.या माघी वारीला लक्ष्मीबाई या गेल्या आठ दिवसापूर्वी वालोपेवाडी येथील गावकऱ्यासोबत गेल्या होत्या. त्या बुधवार दि.२१ फेब्रुवारी रोजी परत आल्या. त्यानंतर दोन दिवसानी म्हणजे शुक्रवार दि. २३ फेब्रुवारी रोजी त्या आपल्या घरातून सकाळी ८ वाजणेच्या सुमारास शेतात निघून गेल्या. दुपारी १२ पर्यंत त्या शेतातून घराकडे परत येत असत. परंतु यावेळी दुपारचे २ वाजून गेले तरी आई लक्ष्मीबाई या का परत आल्या नाहीत म्हणून त्याचा मुलगा त्यांना शोधण्यासाठी शेतात गेला. आपल्या शेतात त्या त्याला कुठेच दिसून आल्या नाहीत. परंतु बाजुलाच असलेल्या प्रकाश याच्या शेतातून कशाचा तरी धुर येत होता. काही तरी तेथे जळत होते.हे पाहण्यासाठी तो तेथे गेले असता त्याला तेथे काटेरी झुडेपे बाभळीची पाला याच्या खाली काही तरी जळत असल्याचे दिसून आले.त्याने जवळ जावन बघितले असता त्याला आपल्या आईची साडी जळत असल्याचे व तिचे अवशेष जळत असल्याचे दिसले. त्याने लगेच बोंब ठोकली आणि वालोपेवाडी कडे पळत गेला.त्याने ही घटना गावचे पोलीस पाटील भालचंद्र कदम, सरपंच अमिषा काजवे यांना दिली. गावातील लोकांना ही माहिती समजताच त्यांनी लागलीच घटनास्थळी धाव घेतली.पोलीस पाटील भालचंद्र कदम आणि सरपंच काजवे हे देखील घटनास्थळी आले. लक्ष्मीबाई हर्चिलकर याचा मृतदेह जळत असल्याचे दिसून आल्यावर पोलीस पाटील कदम यांनी या घटनेची माहिती लगेच चिपळुण पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जळत असलेल्या ठिकाणाहून अर्धवट जळालेला लक्ष्मीबाई याचा मृतदेह बाहेर काढला. बाजुलाच त्यांना तेथे ओढून आणलेल्या खुणा ही दिसत होत्या.तर लक्ष्मीबाई याच्या शेतात रक्ताचे डाग ही पडल्याचे दिसत होते. तर बाजुच्या लक्ष्मीबाई यांच्या शेतात छऱ्याची बंदुक, हातोडा, आणि पक्कड हे मिळून आले. पोलीसांनी ते पंचनामा करून ताब्यात घेतले. एकंदर लक्ष्मीबाई याचा खुन कुणी तरी करून पुरावा नष्ट करणेसाठी त्याचा मृतदेह जाळला असल्याचे दिसत होते.पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेहाचे जळालेले अवषेश ताब्यात घेतले.तर अर्धवट जळालेला मृतदेह शवविच्छेदना साठी चिपळुण येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती मयत लक्ष्मीबाई हर्चिलकर याच्या मुलग्याकडून घेतली. त्याने पोलीसांना माहिती दिली की,मयत लक्ष्मीबाई याचा आणि चुलत भाऊ प्रकाश हर्चिलकर याच्यात सामायीक शेतजमीनीवरून वाद होता. या वादात प्रकाश याने आपल्या आईला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली होती. त्यानेच आपल्या आईचा खुन करून तिचा मृतदेह शेतातील सामायीक जागेत जाळला असल्याचे सांगितले.या घटनेनंतर प्रकाश हर्चिलकर हा घटनास्थळावरून आणि गावातून ही पळून गेला होता.पोलीस त्याचा शोध घेत होते. या घटनेची चौकशी करण्यासाठी चिपळूण पोलीसांनी संशयीत प्रकाश हर्चिलकर याची पत्नी आणि मुलग्याला पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे चौकशी करायला सुरूवात केली.त्यांनी ही मयत लक्ष्मीबाई हर्चिलकर आणि आपल्यात शेतजमीनीतील सामायीक जागेवरून वाद असल्याचे सांगितले. या घटनेचा तपास चिपळुण पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पथक ही करीत होते.या पथकाला फरार प्रकाश हर्चिलकर हा लोटे एमआडीसी मुंबई गोवा महामार्गावर फिरत असल्याचे समजले हे पथक लोटे एमआडीसी येथे गेले असता त्यांना बघून प्रकाश हिर्चिलकर हा पळुन जावू लागला. पोलीसांनी त्याचा पाठलाग करीत असताना तो ऐके ठिकाणी पडला. त्याच्या पायाला मोठी दुखापत झाली. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन रत्नागिरी येथील सरकारी दवाखान्यात उपाचारासाठी दाखल केले. तेथील उपचारानंतर त्याला चिपळुण पोलीसांच्या ताब्यात दिले. या घटनेची फिर्याद मयत लक्ष्मीबाई याच्या मुलग्याने चिपळून पोलीसात दिली असल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी लक्ष्मीबाई अनंत हर्चिलकर (वय ७०) रा. वालोपेवाडी वरचेवाडी याचा खुन करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी प्रकाश हर्चिलकर (वय ४५) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम. ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून फरार प्रकाश हर्चिलकर याला रत्नागिरी येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला हातोडा, विळा जप्त केला.या घटनेचा तपास पो.निरी.परबकर याच्या मार्गदर्शखाली पो.हे.कॉ. एस.आर. झोरे, एम.पी. डोमणे, बी.आर. पालकर, विवेक रसाळ, अतलु कांबळे यांनी केला. सामायीक जमीनीचा वाद हा अत्यंत किलीष्ट असतो.हा वाद काही केल्या मिटत नाही.जो तो या वादात आपलेच बरोबर आहे असे म्हणत असल्याने वाद हा विकोपाला जातो त्यातूनच अशा घटना घडतात एवढे मात्र निश्चित.

## वसुलीच्या तगाद्यामुळे रमेश हैराण...

होते. कालकुंद्री येथे राहत असताना त्यांनी जवळच असलेल्या तुडये येथील गावात आपल्या धंदयाचा जम चांगला बसविला. धंद्याचा चांगला जम तुडये येथे बसल्याने काही वर्षापर्वी ते परिवारासह तुडये येथे राहयला आले. घरोघरी जावून सोन्या चांदीची विक्री करून त्यांनी आपला चांगला जनसपंर्क वाढविला होता. कधी काम करताना अडचण येवू नये म्हणून ते आपल्या बरोबर या काळात ही रॉकेलचा दिवा वापरत होते. या दिव्याखाली ते रात्र आणि दिवस काम करीत असल्याने या भागात ते चिमणीवाला सोनार म्हणून त्याची चांगली ओळख वाढली होती. सोन्या चांदीची दागिने कलाकसुरीने बनविण्यात त्याचा हातखंड होता. त्यामुळे त्याच्याकडे इतर दुकानदारापेक्षा अधिक ग्राहक होते. तसे ते लोकांच्या अडी नडीला उपयोगी पडून त्यांना दगिने ही देत होते. एखाद्याच्या घरी लग्न कार्य असले तर ते त्यांना उधारीवर आणि अल्पदरात दागिणे बनवून देत होते. तुडये गावातील रमेश बाबु पाटील तसा त्याच्या परिचयाचा होता. त्याच्या घरी गेल्या दोन वर्षापूर्वी लग्न कार्य असल्याने त्याने बाळकृष्ण सोनार याच्याकडून काही दागिण्याची खरेदी केली. त्यावेळी रमेश पाटील याने त्यांना काही रक्कम दिली. परंतु अदयाप ही त्याच्याकहून बाळकृष्ण सोनार यांना १ लाख ३० हजार रूपये येणे लागत होते. ही रक्कम सोनार हे रमेश पाटील याच्याकडे वारंवार मागत होते. आपल्या रक्कमेसाठी त्यांनी रमेश पाटील याच्याकडे सारखा तगादा लावला होता. सोनार यांनी पैशाचा तगादा लावला असला तरी त्यांना पैसे देण्यास रमेश पाटील हा टाळा टाळ करीत होता. तो त्यांना सारखे काही ना काही कारण सांगून ती रक्कम देण्यास टाळत होता. त्यामुळे बाळकृष्ण सोनार यांनी रमेश पाटील याला एकदा दोनदा समजही दिली होती. काही तरी करून माझी रक्कम मला दे असे त्यांनी त्याला सांगितले होते. परंतु अलिकडे तर सोनार याच्या सारख्या तगाद्याने रमेश पाटील हा सारखा वैतागलेला होता. त्याला ही एवढी मोठी रक्कम एक रक्कमी देणे शक्य नव्हते, हे सोनार यांना ही माहिती होते. म्हणून त्यांनी त्याला आपली रक्कम थोडी थोडी करून दे असे सांगितले तरी ही तो ती रक्कम काही त्यांना देत नव्हता. याचा राग सोनार यांना आला होता. ते आपली रक्कम काही तरी करून त्याच्याकडून काढून घेण्याच्या तयारीत होते. सोनार यांनी जणू काही त्याच्याकडे पैसे मागण्याचा तगादा लावला होता. या कारणातून त्या दोघात बऱ्याचवेळेला भांडणे वादावादी ही झाली होती. बाळकृष्ण सोनार हे प्रामाणिक आणि शांत संयमी असल्याने गावातील लोकांनी ही त्याची बाजू घेऊन रमेश पाटील याला त्याची रक्कम देण्यास सांगितले. त्याकडे ही रमेश पाटील याने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले होते. सोनार याच्याकडे चिकाटी असल्याने ते त्याच्याकडे पैसे मागायचे सोडत नव्हते. वाटेत कुठे ही रमेश पाटील भेटला की ते त्याला पैशाचे विचारत होते. एकदा दोनदा त्यांनी चार चौघात रमेश पाटील याला आपल्या पैशाबद्दल विचारल्याने रमेश पाटील याला सोनार याचा राग आला होता. चार चौघात त्यांनी आपल्याकडे पैशाची विचारणा करून आपली इज्जत काढली असा त्याचा समज झाला. खरे तर हा दोघाचा देण्या घेण्याचा व्यवहार होता. सोनार यांना रमेश हा देणे लागत असल्याने त्यांनी त्याला विचारणा केली. परंतु चार चौघात सोनार याने आपल्याकडे पैसे मागितल्याने रमेश याने मनात डुख धरला होता. तो सोनार याच्यावर चिडून होता. त्याला आता काही केल्या पैसे दयायचे नाहीत त्याचा कायमचा बंदोबस्त करायचा असा त्याने विचार केला. आता आपल्या पैशाचा व्यवहार हा मध्यस्थामार्फत मिटवूया तुला तुझी रक्कम माझ्या एका मित्राकडून देतो असे रमेश पाटील याने मंगळवार दि.२७ फेब्रुवारीला बाळकृष्ण सोनार यांना मोबाईलवर फोन करून सांगितले. त्याने तुडये गावातील चौकात सोनार यांना दुपारी १ वाजणेच्या सुमारास बोलावून घेतले. सोनार हे चौकात आल्यावर रमेश याने त्यांना आपल्या दुचाकीवर बसविले. त्यांना दुचाकीवर बसवून त्याने तुडये येथून कर्नाटक हद्दीतील धामणी वाघजाई मार्गे चंदगड तालुक्यातील स्वप्नवेल पॉईंट जवळील घनदाट जंगलात आणले. त्यावेळी दुपारचे ३ वाजले असतील जंगलातील एका निर्जन ठिकाणी त्याने आपली दुचाकी थांबवली. आपल्या मोबाईलवरून पैसे देणाऱ्या मध्यस्थाला फोन लावण्याचे नाटक त्याने केले.खरे तर त्या घनदाट जंगलात मोबाईल कनेक्शन टॉवर येत नसल्याचे त्याला माहित होते. पण तो नाटक करीत असल्याचे सोनार यांना माहित नव्हते. त्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला होता.आपली रक्कम आपल्याला मिळणार म्हणून त्यांना आशा होती. त्यासाठीच ते त्याच्याबरोबर गेले होते. काही वेळ फोनवर बोलण्याचे नाटक करीत रमेश पाटील याने आपला फोन बंद केला आणि बेसावध असलेल्या सोनार याच्या मानेवर, डोक्यात आपल्याकडील कोयत्याने सपासप वार केले.त्यासरशी सोनार हे ओरडत खाली पडले. त्याच्या शरिरातून रक्ताची चिळकांडी उडाली. ती रक्ताची चिळकांडी रमेश पाटील याच्या शर्टावर उडाली.सोनार हे ओरडत खाली पडल्यावर विव्हळत पडल्यावर त्याचा मृत्यू झाला असे समजून रमेश पाटील तेथून निघून गेला. त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने त्या घनदाट जंगलात असणाऱ्या वनक्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सोनार यांना बघून त्या वन कर्मचाऱ्यांनी लागलीच जवळच्या चंदगड पोलीस स्टेशनला फोन करून या घटनेची माहिती दिली.या घटनेची माहिती मिळताच चंदगड पोलीस स्टेशनचे पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी गंभीर जखमी असलेल्या सोनार यांना तातडीने आपल्या गाडीतून चंदगड येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले.परंतु तेथील उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. इकडे पोलीसांच्या दुसऱ्या टीमने घटनास्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली. वनविभागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात एका दुचाकी गाडीवरून दोन इसम येत असल्याचे दिसत होते. त्या दुचाकीच्या नंबर प्लेटवरून पोलीसांनी माहिती घेतली असता ती मोटार सायकल तुडये गावातील रमेश पाटील याची असल्याचे माहिती पोलीसांना मिळाली. त्यावरून पोलीसांनी तुडये येथे जावून रमेश पाटील याचे घर गाठले. त्यावेळी घराच्या मागील बाजुस रमेश पाटील हा आपले रक्ताने माखलेले कपडे धुत होता. त्याला पोलीसांनी ताब्यात घेऊन चंदगड पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवा-उडवीचे उत्तरे देत होता. पोलिसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखविला असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी या घटनेची लेखी फिर्याद चंदगड पोलीस ठाण्यात मयत बाळकृष्ण सोनार याच्या पत्नीकडून घेतली. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीसांनी बाळकृष्ण अनंत सोनार (वय ६०) याच्या खून प्रकरणी रमेश बाबु पाटील (वय ४०) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला चंदगड येथील प्रथमवर्ग न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने रमेश पाटील याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेले विळा आणि दुचाकी जप्त केले. या घटनेचा पुढील तपास चंदगड पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.समोरची व्यक्ती ही कितीही जवळची आणि ओळखीची असली तरी ही आर्थिक व्यवहार हा जपूनच करावा लागतो नाही तर त्यातून खूनासारखी अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## प्रियकराच्या डोक्यात प्रेयसीचे...

संध्याकाळी गंगाच्या आईचा तिला कॉल आला, त्यावेळी गंगाने आईला २२ तारखेला माहेरी येऊन माझ्या घरात सुरू असलेला प्रकार सांगते असे सांगितले होते, त्यामुळे नितीन अस्वस्थ झाला. पत्नी गंगा आता आपले प्रताप सासरवाडीत सांगण्याआधी तिला संपवले पाहिजे म्हणून नितीन संधीची वाट पाहू लागला. दि. २१ तारखेला रविवारी गंगाचा काटा काढण्याची योजना नितीन याने आखली. त्याने त्यादिवशी कामासाठी महिला मजूर सांगितल्याच नाहीत. सकाळीच तो शेतात स्प्रिंकलरची शिप बदलण्यासाठी जाऊन परत आला. नितीन सकाळीच उठला, घरच्या शेतीत गव्हास पाणी देण्यास मुलगा आदित्यसह दुचाकीने निघून गेला. जातांना त्याने पत्नी गंगाबाईस तू बटाईने केलेल्या शेतात कापूस वेचण्यासाठी जा, आज मजूर महिला मिळाल्या नाहीत असे फर्मान सोडले. पतीने बटाईच्या शेतात कापूस वेचण्यासाठी जाण्यास सांगितल्याने गंगाबाईने सकाळीच सर्वाचा स्वयंपाक केला. त्यादिवशी पुत्रदा एकादशी असल्याने गंगाबाईचा उपवास होता, त्यामुळे स्वतःसाठी फराळाचा डबा घेऊन गावापासून जवळच असलेल्या बटाईच्या शेतात निघून गेली. दुपारी ११ वाजता दरम्यान नितीन घरगुती वापराचा चाकू घेऊन शेतात गेला. शेतात गेल्यावर त्याचा पत्नी गंगासोबत त्या महिलेच्या संबंधावरून वाद होऊ लागला. या वादात खवळलेला नितीन चाकू घेऊन पत्नीच्या अंगावर धावला. चाकूने वार करणार तेवढ्यात गंगाने हाताने त्याचे वार अडवल्याने तिच्या हातावरचाकूच्या जखमा झाल्या. नितीनचे रौद्ररूप पाहून आरडाओरड करत घाबरून गंगा कपाशीच्या शेतात पळू लागली. पळतांना गंगाच्या पायातील चप्पल शेतात पडली. गंगा पळत असतांना शेतातील एका कडूनिंबाच्या झाडाजवळ नितीनने तिला पकडून तिचे डोके निंबाच्या झाडावर आदळले. गंगा घाबरून अर्धमेली होऊन परत पळत असतांना शेतात पडली. त्याचवेळी जवळच पडलेला वजनदार दगड उचलून क्रूर नितीनने तिच्या डोक्यात घातला तसे रक्ताचे फवारे उडाले. तेवढ्यावर न थांबता त्याने चार वेळा दगड तिच्या डोक्यात घातले. गंगा गतप्राण झाल्याची खात्री पटल्याने नितीन घरी आला. अंघोळ करून गंगाच्या खुनाचा आळ दुसऱ्यावर घेण्यासाठी त्याने दुसरी योजना आखली. दुपारी ३ वाजता गंगाला शेतातून आणण्याचे नाटक करत तो शेतात आला. तो शेताच्या धुऱ्याजवळच हाकेच्या अंतरावर एका झाडाखाली पत्ते खेळत असलेल्या गावकऱ्यांजवळ गेला. त्या लोकांकडे पत्नी गंगाबाबत चौकशी केली. पत्ते खेळणाऱ्यांनीगंगास पाहिले नसल्याचे सांगितले, तेंव्हा त्याने सर्व पत्ते खेळणाऱ्यांना पत्नीला शोधण्यासाठी येण्याची विनंती केली, त्यामुळे ते पत्ते खेळणारेही गंगास शोधू लागले, पण ती दिसत नसल्याने घाबरलेल्या अवस्थेत नितीन घरी आला. त्याने गल्लीतील नागरिकांना गोळा करून माझी पत्नी कुठे दिसत नाही आणि तिथे विशिष्ठ समाजाचे लोक आहेत असे सांगून गावातील लोकांना शेतात नेले. गंगाचा शोध घेतल्यावर तिची एक चप्पल कपाशीच्या सरीत तर दुसरी थोड्या अंतरावर पडलेली तर कापसाची पोतडी पडलेली होती. म्हैशी चारायला आलेल्या एका गुराख्यानेशेतात गंगाचा मृतदेह पडलेल्याचे उपस्थितांना दाखवले. पत्नीचा मृतदेह पहाताच नितीन घाबरला, त्याला काय करावे काही सुचत नव्हते. या गंभीर घटनेची माहिती मिळताच वडनेर येथे स्नेहसंमेलनात उपस्थित असलेले नांदुरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विलास पाटील आपल्या सहकाऱ्यांसह काही मिनिटात घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी नितीन कळसकार यांनी बटाईने केलेल्या शेतात बघ्यांची प्रचंड गर्दी होती. कपाशीच्या शेतात गंगा कळसकार यांचा मृतदेह पडलेला होता. चेहरा दगडाने ठेचल्याने विद्रुप झाला होता. काही अंतरावर रक्ताने माखलेले दगड पडले होते तर घरगुती वापराचा रक्त लागलेला चाकूही पडलेला होता. मृतक गंगा यांच्या हातावर चाकूचे वार होते. घटनास्थळी नितीन कळसकार शेताशेजारी पत्ते खेळणाऱ्या एका विशिष्ट समाजाच्या व्यक्तींनी पत्नीवर अत्याचार करून तिचा खून केल्याचे पोलिसांना सांगत होता, तर त्या व्यक्तींना शिवीगाळ करून गावातील नागरिकांना माझ्या पत्नीवर या लोकांनी अत्याचार केल्याचे ओरडूनसांगत चिथावणी देत होता. त्याचे नातेवाईक मृतकावर अत्याचार झाल्याचे पोलिसांना सांगत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी देवराव गवळी यांनी घटनास्थळी धाव घेतली. चिडलेल्या नागरिकांना शांतता ठेवण्याचे आवाहन करून संशय असलेल्या त्या गावकऱ्यांची कसून चौकशी करण्यात आली. वडनेर गावात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. ठसेतज्ञ व श्वान पथकास पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा करून मृतदेह स्थानिक आरोग्य केंद्रात पाठवला. श्वान राणीने त्या महिलेच्या मृतदेहाजवळ घुटमळत मृतकाचा पती नितीन याच्याकडेच धाव घेतली. शेतात पडलेल्या रूमालाचा वास दिल्यानंतरही नितीनकडेचश्वानाने धाव घेतली. स्वाभाविक पोलिसांना नितीनवर संशय आला होता. नितीन कळसकार याच्या फिर्यादीवरून मृतक गंगा कळसकार वय ३५ यांच्या खून प्रकरणी नांदुरा पोलिसांनी भा.दं.वि. ३०२ नुसार गुन्हा दाखल केला. गंगाचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी बुलढाणा हलवण्यात आला होता, पण बुलढाणा येथे मृतदेहाचे काही विशिष्ट नमुने घेण्याची व्यवस्था । नसल्याने दुसऱ्या दिवशी मृतदेह अकोला येथे पाठवण्यात आला. मृतदेहाची अकोला येथे उत्तरीय तपासणी झाल्यानंतर २२ तारखेला रात्री साडेनऊ वाजता मृतक गंगावर मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. शेतात कापूस वेचणाऱ्या महिलेवर अत्याचार करून निर्घृण खून झाल्याने खळबळ निर्माण झाली होती. विविध शंका-कुशंका व्यक्त केल्या जात होत्या. विशिष्ट समाज व नागरिकांवर संताप व्यक्त होत होता. २३ तारखेला नांदुरा पोलिसांनी तपासाची गती अधिक तीव्र केली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मृतकचा पती नितीन हा ११ वाजता घटनास्थळी असल्याचे निष्पन्न झाले होते, तर मृतकवरअत्याचार झाला नसल्याचा प्राथमिक अभिप्राय पोलिसांना वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून प्राप्तझाला होता, त्यामुळे वेळ न घालवता पोलिसांनी नितीन यास ताब्यात घेऊन विविध प्रश्नांची सरबत्ती केली. पोलिसांच्या प्रश्नांची उत्तरे देतांना नितीनची बोबडी वळली, त्याने सरळ पोलिसांना शरण येत घडलेला सर्व प्रकार कथन केला. आणि अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पत्नीचा त्याने काटा काढून खुनाचा आरोप विशिष्ट समाजाच्या नागरिकांवर लावत दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा भयंकर प्रकार समोर आला. दूध का दूध, पाणी का पाणी करत परत एकदा कानून के हात बहोत लंबे होते है। हे नांदुरा पोलिसांनी दाखवून दिले. संशयित आरोपी नितीनची रवानगी कारागृहात झाली असून दोन्ही मुले आई-वडीलांना आता पोरकी झाली आहेत, त्यामुळे अनैतिक संबंधात आकंठ बुडालेल्या नितीनने स्वतःच्या हाताने स्वतःच्या घराची राखरांगोळी केली आहे. घटनेचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक सुनिल कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी डी. एम. गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक नागेश जायले, पोलीस हेडकॉन्स्टेबल निंबोळकार, पोलीस नाईक कैलास सुरळकर, शैलेश बहादूरकर, विक्रम राजपूत, राहुल ससाणे, मिलिंद जवंजाळ, विनोद भोजने, रवींद्र सावळे करत आहेत.

04 TO 10 MARCH 2024 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 3/2/2024 9:50 PM Page 1



# हत्येच्या गुन्ह्यातील चार वर्षे फरार गँगस्टरला शांतीनगर पोलिसांनी उत्तर प्रदेश येथून केली अटक



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील शांतीनगर परिसरात गोळीबार करून एकाची हत्या करण्याच्या गुन्ह्यात चार वर्षापासून फरार असलेल्या आरोपीस अखेर शांतीनगर पोलिसांनी उत्तर प्रदेश येथून ताब्यात घेत मुसक्या आवळल्या आहेत. विशेष म्हणजे अटक आरोपी हा उत्तर प्रदेश येथे गँगस्टर म्हणून कुप्रसिद्ध होता अशी माहिती शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर इंदलकर यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. वकिल उर्फ सानु अब्बास मन्सुरी असे अटक आरोपीचे नाव आहे. शांतीनगर परिसरात राहणारे सत्तार मंसुरी यांच्या उत्तरप्रदेश फुलपुर, जिल्हा प्रयागराज येथील जमिनीच्या वादातुन गुलजार नगर येथे उत्तरप्रदेश येथील आरोपींनी कट रचुन दिवसाढवळ्या गोळ्या घालुन हत्या केली होती. याप्रकरणी दाखल गुन्ह्यात शांतीनगर पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली होती. पण मुख्य आरोपी वकिल उर्फ सानु अब्बास मन्सुरी हा गुन्हा झाल्या पासून चार वर्षे फरार होता. गुप्त बातमीदार कडून वकिल उर्फ सानु अब्बास मन्सुरी हा उत्तर प्रदेश राज्यातील फुलपुर जिल्हा प्रयागराज परिसरात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे भिवंडी पोलीस उपायुक्त डॉ.श्रीकांत परोपकारी, पूर्व विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे व शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे व पोलिस कर्मचारी श्रीकांत धायगुडे, रूपेश जाधव, प्रशांत बर्वे, पोलिस हवालदार संतोष मोरे, रिजवान सैय्यद, किरण मोहिते, दिपक सानप, मनोज मुके यांचे पथक तपासासाठी उत्तरप्रदेश येथे रवाना झाले. फुलपुर, पोलीस ठाणे, प्रयागराज यांचे मदतीने पोलिस पथकाने फरार आरोपी वकिल उर्फ सानु अब्बास मन्सुरी याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेत अटक केली आहे. अटक आरोपी वकिल उर्फ सानु अब्बास मन्सुरी हा फुलपुर पोलीस ठाणे, प्रयागराज येथील गॅंगस्टर आरोपी असुन त्याच्या विरोधात उत्तर प्रदेश येथील विविध पोलिस ठाण्यात खुन, खुनाचा प्रयत्न असे गंभीर स्वरूपाच्या सात गुन्ह्यांची नोंद आहे.

# उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनचे मासिक पाळी संदर्भात किशोर वयीन मुलींना मार्गदर्शन आणि चर्चासत्र संपन्न

**वाडा/प्रतिनिधी**

किशोरवयीन मुलींना येणाऱ्या मासिक पाळी दरम्यान उद्भवणाऱ्या समस्या, सुरक्षितता, सावधानता व स्वच्छता या बाबत अवगत करून देण्याच्या उद्देशाने उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नांदगाव येथे उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन च्या वतीने निराली मासिक पाळीवर बोलू काही. या मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या प्रशिक्षिका प्रणाली पाटील व राज्य समन्व्यक सुषमा थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या सत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्त्या मार्गदर्शक म्हणून स्त्री रोगतज्ञ डॉ. कांचन जाधव यांची उपस्थिती लाभली. या सत्राचे आयोजन प्रामुख्याने इयत्ता सहावी ते अकरावी वर्गातील विद्यार्थिनी साठी केले गेले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. कांचन जाधव यांनी मासिक पाळी सत्र, यादरम्यान



घडून येणारे संप्रेरकीय बदल, त्याचे मुली आणि महिलांवर होणारे शारीरिक व मानसिक परिणाम, मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी, स्वच्छता, मासिक पाळी संदर्भात गैरसमज, मेनोपॉज, प्री. अँड पोस्ट मेनोपॉझल चेंजेस, PCOD, Multiple fibroid, लैंगिक आरोग्य... अशा विविध विषयावर सखोल विस्तृत माहिती दिली. तसेच विद्यार्थीनी व शिक्षिकांसोबत विविध विषयांवर प्रश्नोत्तराच्या स्वरूपात चर्चा केली. चर्चासत्राच्या शेवटी उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थिनींना अल्पोपहार देण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक मुंढे एस, जी. यांची सन्माननीय उपस्थिती लाभली. तसेच विद्यार्थिनी सोबत कनामे, वर्षा माकणे, शर्मिला पाटील, सूर्या भताने, सुनीता लाड, स्वती राऊतराव, रेश्मा साळुंके यांनीही या मार्गदर्शन सत्रास उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा माकणे यांनी केले. तर उर्मिला कनामे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

# आदिवासीं खेळाडूंसाठी स्पोर्ट्स टॅलेंट हंट चाचणी



**पालघर/प्रतिनिधी**

पाड्यावरील आदिवासी भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना, शालेय जीवनात खेळातील प्राथमिक ज्ञान व कौशल्य अवगत होण्याच्या दृष्टीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पालघर व अजित कुलकर्णी, एम्स स्पोर्ट्स फाऊंडेशन, ठाणे यांच्यावतीने तालुका निहाय आदिवासी शाळांतील १० ते १४ वर्ष वयोगटील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी साठी 'टॅलेंट हंट' उपक्रम राबविण्यात येत आहे. अजित कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक व त्यांची सपोर्ट टीम यांच्या माध्यमातून, मुख्यत्वे मोखाडा, विक्रमगड, जव्हार, वाडा, तलासरी, पालघर व वसई ग्रामीण या मधील २०० आदिवासी शाळामध्ये, हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. याची सुरवात विक्रमगड व वाडा तालुक्यातून करण्यात आली आहे. यामध्ये एम्स स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या वतीने प्रत्येक शाळेत २५,००० रू चे मोफत क्रीडा साहित्य, स्पोर्ट्स एक्सरसाईज चित्रफीती, देण्यात येत आहेत. प्रत्येक शाळेत ३० ते ४० विद्यार्थी निवडून या खेळाडूंना एम्स स्पोर्ट्स फाऊंडेशन मोफत मार्गदर्शन करण्याचा करार अजित कुलकर्णी, अंतर्राष्ट्रीय क्रीडा मारगदर्शक यांच्या सोबत करण्यात आला आहे. या मधून निवडले गेलेले खेळाडू यांची 'धाडस' या नावाची स्पर्धा घेतली जाणार आहे. व १ मैल धावणे यासाठी 'भरारी' या नावाची रोड रेस घेतली जाणार आहे. हे आदिवासी पाडे हे मुख्य रस्ता पासून आत जंगलात ५ ते ८ ज्ञा असल्याने या स्पर्धेत विजयी होणाऱ्या खेळाडूंना 'सायकली बक्षीस' म्हणून देण्याचे ,एम्स स्पोर्ट्स फाऊंडेशन ने मान्य केले आहे. या उपक्रमाचा आदिवासी व डोंगरी भागातील शालेय विद्यार्थ्यांना खूप फायदा होईल.

# वाडा उपविभागात २५ लाखांच्या वीजचोरी प्रकरणी ४९ जणांविरुद्ध कारवाई

**वाडा/प्रतिनिधी**

महावितरणच्या वाडा उपविभागात जानेवारी महिन्यात ४९ वीज चोरांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या वीज चोरट्यांनी २५ लाख रुपये किंमतीची १ लाख ३२ हजार युनिट विजेची चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण परिमंडलात वीजचोरी शोध मोहिम नियमितपणे सुरू आहे. त्यांतर्गत वाडा उपविभागातील वाडा, वावेघर, धुमालपाडा, आपटी, खरीवली, विवेकनगर, अम्बिस्ते,



कांदिवली रोड आदी परिसरात व्यापक वीजचोरी शोध मोहिम राबवण्यात आली. या शोध मोहिमेत ४९ जणांकडून सुरू असलेली २५ लाख १० हजार रुपयांची वीजचोरी उघडकीस आली. वीजचोरांमध्ये अम्बिस्ते ग्रामपंचायतीचाही समावेश असून या ग्रामपंचायतीच्या सरपंचाविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. वीजचोरीचे देयक आणि तडजोडीची रक्कम भरण्याच्या नोटिसा संबंधितांना बजावण्यात आल्या असून विहित मुदतीत या रकमांचा भरणा टाळणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल होण्यासाठी पोलिसांत फिर्याद देण्यात येणार आहे. वाड्याचे उपविभागीय अभियंता अविनाश कटकवार यांच्या नेतृत्वाखाली सहायक व कनिष्ठ अभियंते, जनमित्र तसेच सुरक्षारक्षक यांच्या चमुने ही कामगिरी केली.

## वाहणाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**वाडा** : मनोरहून वाड्याच्या दिशेने जात असलेल्या दुचाकी स्वाराला किरवली गावाच्या हद्दीत मागून येणाऱ्या अज्ञात वाहणाने धडक दिल्याने दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाला आहे. विक्रमगड तालुक्यातील दाढरे गावातील रहिवाशी अनिल हरजी रावते (३५) हा वाड्याच्या दिशेने दुचाकीवरुन जात असताना किरवली हद्दीत मागून येणाऱ्या अज्ञात वाहणाने धडक दिल्याने रावते याचा जागीच मृत्यू झाला आहे.

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक २४ सन २०२०-२०२१**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता कंत्राटदार यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. २६/०२/२०२४ ते ०४/०३/२०२४ सकाळी ११.०० ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

फटिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण १२ (बारा) कामे समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | मौजे देह्याळे पाटीलपाडा अंतर्गत रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. १७७ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८१४०७२/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| २. | पावन भगतपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा. ४१७ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८१४०७२/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ३. | धरमपुर खिंड ते पावन मराठी शाळा रस्त्याची सुधारणा करणे. ग्रा.मा. ४२० ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८१६६७३/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ४. | नागझरी भोनारपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ११८ ता.डहाणू, जि. पालघर | रु. ८१७२८०/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ५. | इजिमा-२१ ते नंबरपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. १२१, ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८१६३८१/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ६. | नागझरी मासुपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. १२० ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८२०३५०/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ७. | खुबाळे नंबरपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. १६५ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८१७८४४/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ८. | वंकास आवरपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. १५५ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८१६६५२/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ९. | रा.म.मा. ८ ते गेटीपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ४३५, ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८१७२४६/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| १०. | आंबेसरी कातकरीपाडा रस्त्याची सुधारणा करणे. ग्रा.मा. १३१ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८२४०१८/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| ११. | इजिमा-१७ ते नवनाथगांव रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ३३८ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८२००१८/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |
| १२. | गेटीपाडा ते कोटवीपाडा रस्ता सुधारणा करणे. ग्रा.मा. ४३४ ता. डहाणू, जि. पालघर | रु. ८२०७७७/- | ५०५४ मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २६/०२/२०२४ ते दि. ०४/०३/२०२४ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. ०५/०३/२०२४ दुपारी ३.०० नंतर शक्य झाल्यास.

**जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/२६२९**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४,
दिनांक : २४/०२/२०२४

**सही/-**
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर करिता

**विमाका/कोवि/२०२३-२०२४/४२७**

# काँग्रेसचे अमर खानापुरे यांच्या वाढदिवसानिमित्त ४८ जणांचे रक्तदान



**औसा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आणि औसा जनता को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन अमर खानापुरे यांच्या वाढदिवसानिमित्त वीर हनुमान मंदिरामध्ये आयोजित रक्तदान शिबिरामध्ये औसा शहर व तालुक्यातील ४८ युवकांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले. फ्रेंड्स क्लब औसा अमर खानापुरे मित्र मंडळ व युवक काँग्रेस यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराच्या माध्यमातून ४८ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले. याप्रसंगी सर्वश्री गोपाळ धानुरे, विजय कोचेटा, किरण पारुडकर, जयराज कसबे, लातूर जिल्हा ग्रंथालय संघाचे प्रभाकर कापसे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. अमर खानापुरे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रतिवर्षी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते यावर्षीच्या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदात्यांनी उस्फुर्त सहभाग घेऊन गरजू रुग्णांना वेळेत रक्तपुरवठा करता यावा म्हणून सहकार्य केले.

# वाडा-भिवंडी महामार्गावरील अपघातात पती-पत्नीचा मृत्यू



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा-भिवंडी महामार्गावर शिरीषपाडा गावाच्या जवळ झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील नव दाम्पत्याचा जागीच मृत्यु झाला आहे. दुभाजकातून अचानक रस्त्यावर ट्रॅक्टर आल्याने हा अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी माहिती दिली आहे. पंकज शिवचंद्र राय (२६) व मनिषा राय (२४) रा. बोईसर असे या मृत दांपत्याचे नावं असून दोघांचाही ४ फेब्रुवारीला थाटामाटात विवाह संपन्न झाला होता. बोईसर येथून आपल्या दुचाकीने दोघेही वाडा मार्गे आसनगाव (शहापुर) येथे निघाले असताना वैतरणा नदी पुलाजवळ अचानक रस्त्यावर आलेल्या ट्रॅक्टरला धडकून हा अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की ज्यात दोघा नव दाम्पत्याचा जागीच मृत्यू झाला असून वाडा पोलिसांत उशीरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सूरू होते. मनोर-वाडा-भिवंडी या महामार्गावर व्यावसायिकांना वाटेल तिथे दुभाजक तोडण्यात आले असून यामुळे हा महामार्ग अधिक धोकादायक बनला आहे. ट्रॅक्टर चालक या घटनेने नंतर लगेच फरार झाला असून भीषण अपघाताने हळहळ व्यक्त केली जात आहे.

# उदगिर शहरात देह व्यापार करणाऱ्या कुंटनखाण्यावर धाड; ८ जणांना पकडले

**देवणी/प्रतिनिधी**

उदगीर शहरातील नाईक चौक परिसरात एकाच्या घरात ग्रामीण पोलीसांनी सव्वा पाचच्या सुमारास धाड टाकून ८ जणांना पकडले तर २ महिलांसह ६ जणांविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, उदगीर ग्रामीण पोलीसांना गुप्त माहिती मिळाल्यावरुन दि.१५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सव्वा पाचच्या सुमारास शहरातील नाईक चौक भागातील पोतदार निवासस्थानी धाड टाकली असता त्यांना चार महिला, तीन ग्राहक पुरुष व घरमालक कुंटणखाना चालवत असल्याचे पोलिसांना दिसून आल्याने त्यांना रंगेहात पकडले. दोन महिला हे स्वतःच्या आर्थिक फायद्या करीता पीडित दोन महिलांना पैशाचे आमीष दाखवून देह व्यापारास प्रवृत्त करवुन घेवून कुटनखाना चालवतांना मिळून आले व तसेच श्रीनिवास रमेश पोतदार याने स्वत:च्या आर्थीक फायद्या करीता कुटनखाना चालवण्याकरीता जागा उपलब्ध करून दिली. तर शंकर काशिनाथ कुंभारगीरे, सुनिल युवराज चांदेश्वरे, राजकुमार प्रकाश कुंभारगीरे यानी वरील महिलांना वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करताना मिळून आले व तसेच सदर घटनास्थळाच्या २०० मिटरच्या आत सार्वजनीक ठिकाण दवाखाणा, मंदिर आणि मार्केट असताना देह व्यापार सुरू होते. घटनास्थळी उपविभागीय अधिकारी दिलीप भागवत व पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी भेट देऊन माहिती घेतली. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक परशुराम देवकत्ते यांच्या फिर्यादीवरून उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं.९३/२०२४ कलम ३७०, ३४ भादवी सह कलम ३,४,५,७, अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनीयम १९५६ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक अरविंद पवार हे करीत आहेत. सदरील प्रकरणातील दोन महिलांसह ६ जणांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी उदगीर यांच्या न्यायालयात हजर केले असता सदरील ६ आरोपींना न्यायालयाने दि.१८ फेब्रुवारी पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे. अशी माहिती पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिली. उदगीर ग्रामीण पोलिसांनी टाकलेल्या धाडीत ४ महिला व ४ पुरुषांना ताब्यात घेतले होते. त्यातील २ पिडीत महिलांना रात्रीच एक वाजण्याच्या सुमारास प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी उदगीर यांच्या न्यायालयात हजर केले असता त्यांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना लातूर येथील महिला सुधारगृहात रवानगी करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

# सत्तेतील कोंडमारा!

कधी कधी माणसाच्या समोर खमंग आणि रुचकर पदार्थांचे ताट वाढलेले असते. पण त्याला असे काही रोग असतात कि ताटातले पदार्थ तो इच्छा असूनही खाऊ शकत नाही. कारण गोड खाल्ले तर मधुमेह वाढण्याची भीती असते. तिखट खाल्ले तर ॲसिडीटी होण्याची भीती असते आणि भरपेट खाण्याचा प्रयत्न केला तर आपल्याच कुटुंबातील लोक पुढ्यातले ताट ओढून घेण्याचा प्रयत्न करीत असतात किंवा ताटातल्या पदार्थामध्ये माती कालावण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे पुढ्यात ताट असूनही माणूस दुखी असता. त्याचा कोंडमारा झालेला असतो. आज अशीच काहीशी अवस्था महाराष्ट्राच्या सत्तेत असलेल्या अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या सहकाऱ्यांची झालेली आहे. सरकार सोबत आल्याचा आनद फार काळ टिकला नाही. भाजपा सोबत सतेत राहून पावला पावलावर उपरेपानाची भावना जाणवतेय. त्यातून स्वाभिमान हरवल्याने तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागतोय. हि एक प्रकारे पक्षाशी गद्दारी केल्याची शिक्षाच म्हणावी लागेल. पण शिवसेना आणि राष्ट्रवादी फोडणाऱ्या लोकांना खरी शिक्षा अजून मिळायचीच आहे. आणि येत्या लोकसभा व विधासभा निवडणुकीत ती शिक्षा त्यांना मिळणारच आहे. असे महाराष्ट्रातील १२ कोटी जनता म्हणतेय. आपल्या घरातील हक्काची अर्धी भाकरी आणि शेजाऱ्यांनी फेकलेले तुकडे यातला फरक आता काही लोकांना कळायला लागला आहे. पण परतीचे दोर कापल्याने, आता पश्चाताप करण्यापलीकडे दुसरे काहीच हाती राहिलेले नाही. भाजपला या देशातील सर्व पक्ष संपवायचे आहेत. त्यासाठी फोडा फोडीचे राजकारण सुरु आहे. पण जे फुटलेत त्यांची आज काय अवस्था आहे, हे संपूर्ण देश बघतोय. भाजपने लोकसभा निवडनुकीसाठी ४०० पारचा नारा दिलाय . आता त्यांनी ४०० पारचा नारा दिलाय म्हणजे त्यांना किमान ४५० जागा लढवाव्या लागणार. मग ५४३ पैकी त्यांनी जर ४५०० जागा लढवल्या, तर त्यांच्या सोबत असलेल्यांना काय मिळणार बाबाजीचा घंटा! जे आज आपले हक्काचे घर फोडून भाजपा सोबत गेले आहेत, त्यातील कित्येकांना निवडणुकीचे तिकिट मिळेल की नाही याची काहीच शास्वती नाही. भाजपला महाराष्ट्रात ४५ प्लस जागा मिळवायच्या आहेत. याचा अर्थ त्यांना किमान ३५ ते ४० जागा लढवाव्या लागतील . त्यांनी ४० जागा लढवल्या तर दादा आणि शिंदेंच्या वाट्याला काय येणार? त्यामुळेच आतापासूनच महायुती मधील नेत्यांनी एकमेकांच्या मतदार संघांवर हक्क सांगायला सुरुवात केली आहे. कोकणातल्या सिंधुदुर्ग -रत्नगिरी मतदार संघावर शिंदेंची शिवसेना दावा करतेय. त्यासाठी मंत्री उदय सामंत यांच्या भावाने निवडणुकीची तयारीही केली आहे. तर आम्ही हा मतदार संघ सोडणार नाही असे नारायण राणे सांगत आहेत. त्यामुळे हा मतदार संघ महायुतीत कळीचा मुद्दा ठरू शकतो. महाराष्ट्रातील ४८लोकसभा मतदारसंघांपैकी असे कितीतरी मतदारसंघ आहे की, ज्या ठिकाणी महायुतीतल्या दोन पक्षांनी दावा केलेला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचा वाद तर हाणामारी पर्यत पोहोचला होता. कल्याण मधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे विद्यमान खासदार आहेत. तर भाजपाला हा मतदारसंघ हवा आहे. त्यामुळे भाजपा आणि शिंदे गटांच्या कार्यकर्त्यामध्ये सध्या भयंकर शीतयुद्ध सुरू आहे. याच शीतयुद्धातून भाजपा आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे गटाच्या महेश गायकवाड यांच्यावर पोलीस ठाण्यात घुसून गोळीबार केला होता. निमित्त जरी जमिनीच्या वादाचे असले, तरी त्याला कल्याण लोकसभा मतदारसंघावरील दाव्या प्रती दव्याचे मुख्य कारण होते. त्यामुळे भविष्यात इतर मतदारसंघांमध्ये सुद्धा अशाच घटना घडू शकतात. भाजपाची सध्याची स्थिती पाहता त्यांच्याकडे २३ खासदार आहेत. त्यामुळे त्यांच्या २३ जागा फिक्स आहेत. परंतु तेवढ्यावर ते समाधानी नाहीत. त्याला आणखी किमान १७ ते १८ जागा हव्या आहेत. त्यामुळे शिंदे आणि अजित पवार गटाची मोठी कोंडी झालेली आहे. या दोघांनीही आपल्या पक्षांतर्गत झालेली ही कोंडी लवकर फोडली नाही, तर या दोन्ही गटातील हजारो कार्यकर्ते एक तर आपल्या मूळ पक्षात परततील किंवा भाजपात जातील. त्यामुळे सत्तेसाठी बंड करून एकनाथ शिंदे किंवा अजित पवार यांनी काय मिळवले? शेवटी पदरी निराशाचना! भाजपला कोणत्याही परिस्थितीमध्ये शिवसेना फोडायची होती. कारण हिंदुत्वाच्या एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नव्हत्या. त्यामुळे महाराष्ट्रातील हिंदुत्ववाद्यांना आपल्याकडे वळवण्यासाठी भाजपला शिवसेना फोडावी लागली. मात्र हीच गोष्ट शिवसेनेतून फुटलेल्या लोकांच्या लक्षात आली नाही. आज परिस्थिती अशी आहे की भारतीय जनता पार्टीला शिंदे किंवा अजित पवार यांची काहीही पडलेली नाही. या दोघांना टाळूनही ते महाराष्ट्रात आपलं स्वबळाचा सरकार आणू शकतात. एव्हाना त्यांनी शिंदे आणि अजित पवार गटातील कित्येक आमदारांना आपल्या बाजूने वळवलेही असेल. त्यामुळे उद्या जागा वाटपावरून शिंदे किंवा अजित पवार गटात मोठी फूट पडली, आणि अर्ध्यापेक्षा अधिक लोक जर भाजपात गेले किंवा आपल्या मूळ पक्षात परतले तर कोणालाही आश्चर्य वाटायला नको. जरी शिंदे आणि पवार गटात फूट पडली व त्यांचे काही आमदार भाजपा मध्ये गेले तरी त्यांना लोकसभा किंवा विधानसभेच्या निवडणुकीला निवडून येणं वाटतं तेवढं सोपं नाही. कारण त्यांनी आपल्या मूळ पक्षाशी केलेल्या गद्दारीमुळे ते महाराष्ट्रातील जनतेच्या नजरेतून उतरलेले आहेत. आणि महाराष्ट्रातील साडेबारा कोटी जनता या गद्दारांना धडा शिकवण्यासाठी सज्ञ झालेली आहे. त्यामुळे हे लोक कुठल्याही पक्षातून निवडणूक लढवू देत, त्यांचं भविष्य ठरलेल आहे. अशा स्थितीत शिंदे आणि अजित पवार यांनी किती जरी दावे केले, तरी त्यांच्या पक्षाचा शेवट काय असेल हे महाराष्ट्रातील जनतेला पूर्णपणे ठाऊक आहे. कारण दुसऱ्याचे पक्ष फोडून सरकारे बनवता येतात. पण ती सरकारे जास्त काळ चालवता येत नाहीत किंवा अशा तकलादू महायुत्या जास्त काळ टिकत नाहीत. हा आजवरचा भारतीय राजकारणाचा इतिहास आहे. तेव्हा महाराष्ट्रात मोदींनी जे ४५ पेक्षा अधिक जागांचे स्वप्न पाहिलेले आहे, ते त्यांचे स्वप्न धुळीला मिळाल्याशिवाय राहणार नाही आणि त्याची दोन कारणे आहेत. पहिलं कारण म्हणजे महाराष्ट्राने गद्दारांना कधीही माफ केलेले नाही आणि दुसरं कारण म्हणजे महाराष्ट्र हा शाहू फुले आंबेडकरांचा प्रज्ञावंत महाराष्ट्र आहे. इथे जातीयवादाला अजिबात थारा नाही. भाजपा शिवसेनेबरोबर मागच्या वेळेला होती म्हणून त्यांना २३ जागा मिळाल्या. यावेळी त्यांच्या हिंदुत्वाची इथे काय अवस्था होईल हे सांगायला ज्योतिषाची आवश्यकता नाही. त्यामुळे आगामी लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीचा निकाल ठरलेला आहे व महाराष्ट्र भाजपाला धडा शिकवन्याच्या तयारीत आहे.

## शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

### दिलेला शब्द पाळला, लाखो कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी निर्णय



**मुंबई/प्रतिनिधी**

राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील (एनपीएस) बाजारामधील चढ-उतारामुळे निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासन स्वीकारेल असे जाहीर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा निर्णय आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात जाहीर केला. या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ, तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के इतके कुटुंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ मिळणार आहे. हा निर्णय लाखो कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीनं महत्वाचा आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दृष्टीनंही हितकारक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच कर्मचारी संघटनांना दिलेला शब्द पाळल्याचेही नमूद केले. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना सुधारित करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर अभ्यास केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री निवेदनात म्हणाले की, दिलेल्या आश्वासनानुसार राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना सुधारित करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव व सेवा विभागाचे अपर मुख्य सचिव यांनी संघटनेसोबत चर्चा करुन सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची तत्वे निश्चित केली आहेत. त्यास अधिकारी, कर्मचारी संघटनेनेही सहमती दर्शवली आहे समितीचे निष्कर्ष व शिफारशी विचारात घेऊन राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील बाजारामधील चढ-उतार यामध्ये निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्विकारावी हे शिफारशीतले तत्व मान्य करुन राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील नियत वयोमानानुसार निवृत्त होणारे कर्मचारी यांनी जर प्रस्तावित सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% इतके निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ तसेच निवृत्तीवेतनाच्या ६०% इतके कुटुंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ मिळेल याबाबतीत राज्य शासनातर्फे यथोचित कार्यवाही करण्यात येईल.' मुख्यमंत्री म्हणाले की, वयोमानानुसार निवृत्ती स्वीकारावी लागते. त्यामुळं निवृत्तीवेतन हाच अनेकांसाठी जगण्याचा आधार ठरतो. म्हणूनच आम्ही या विषयावर सुरुवातीपासून संवेदनशील राहिलो आहोत. निवृत्तीनंतर शासकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सन्मानपूर्वक आयुष्य जगता यावं हे तत्व मान्य केलंय. याविषयावर आम्ही राज्य सरकारी कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या विविध संघटनांशी वारंवार संवाद-संपर्कात होतो. ज्या-ज्यावेळी या संघटनांनी या विषयावर चर्चेची, बोलण्याची मागणी केली. त्या-त्यावेळी आम्ही त्यांना वेळ दिला. समितीच्या अहवालावरही बैठका घेण्यात आल्या. मंत्रिमंडळातील सहकारी, कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधीशी, तज्ज्ञांशीही चर्चा केली आहे. यात उपमुख्यमंत्री तथा तत्कालिन वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस तसेच विद्यमान वित्तमंत्री अजित पवार यांनीही सकारात्मक सूचना केल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

दरम्यान, मध्यंतरी केंद्राप्रमाणेच राज्यातील ८० वर्षे पूर्ण झालेल्या निवृत्तीवेतन धारकांना वाढीव निवृत्तीवेतन देण्याची मागणी तसेच २००५ मध्ये भरतीची जाहिराती निघाल्या, पण भरती प्रक्रीया पूर्ण झाली नसल्याने कालांतराने सेवेत दाखल झालेल्यांना जूनी निवृत्तवेतन योजना लागू करण्याचा निर्णय घेतल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

**नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन व राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीबाबत...**

शासनाने दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू केली आहे. तसेच केंद्र शासनाप्रमाणे दिनांक १ एप्रिल २०१५ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू करण्यात आली आहे. या आर्थिक वर्षात राज्यामध्ये राज्य सरकारी कर्मचारी तसेच राज्य स्वायत्त संस्थेतील कर्मचारी यांची संख्या १३ लाख ४५ हजार इतकी असून यामध्ये राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असणारे कर्मचारी ८ लाख २७ हजार इतके आहेत. त्यावर शासनामार्फत जुन्या निवृत्तिवेतन योजनेवर ५२ हजार ६८९ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत शासनाचा हिस्सा हा ७ हजार ६८६ कोटी रुपये इतका आहे. याशिवाय एकूण वेतनावरील खर्च १ लाख २७ हजार ५४४ कोटी इतका आहे.

**तुलनात्मक अभ्यास समितीविषयी...**

राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली व जुनी निवृत्तिवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करणारी समिती १४ मार्च २०२३ रोजी स्थापन केली गेली होती. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीअंती खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजनेबाबत ही समिती शिफारसी- अहवाल सादर करणार होती. या समितीत भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी सुबोध कुमार, के. पी. बक्षी, सुधीरकुमार श्रीवास्तव तसेच लेखा व कोषागारे विभागाचे संचालक यांचा समावेश होता. या समितीनं अनेक राज्यातील परिस्थितीचा साकल्याने अभ्यास करून, अहवाल सादर केला आहे.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत होणार ३९ पुस्तकांचे प्रकाशन

**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून संपूर्ण वर्षभरात छपाई होऊन सिद्ध झालेली पुस्तके दरवर्षी २७ फेब्रुवारी, मराठी भाषा गौरव दिनी प्रकाशित करण्याची मंडळाची अनेक वर्षांची परंपरा आहे. यानुसार अत्यंत मौलिक अशा नव्या ३९ पुस्तकांचे प्रकाशन मराठी भाषा गौरवदिनी मंगळवार दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे यांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्थापनेपासून मंडळाने पुस्तक प्रकाशन या मुख्य उद्दिष्टानुसार आजमितीपर्यन्त ६६६ ग्रंथ प्रकाशित केले आहेत. मागील वर्षभरात छपाई झालेल्या ३९ पुस्तकांमध्ये प्रामुख्याने डॉ.अरुणा ढेरे लिखित भारतीय विरागिणी' हे पुस्तक प्रकाशित करण्यात येत आहे. या ग्रंथामध्ये भारतीय पातळीवरील काव्यविश्वातील कवयित्रींची- संत आणि भक्त अशा स्त्रियांची कालसंबद्ध पार्श्वभूमी, त्यांनी निवडलेले भक्तिमार्ग, त्यांचा परमार्थविचार, लौकिकाविषयीची त्यांची दृष्टी, त्यांनी केलेले कौटुंबिक आणि सामाजिक संघर्ष, त्यांची जीवनसाधना आणि त्यांनी व्यक्त केलेले स्त्रीत्वाचे संवेदन यांचे दर्शन होते. तर, चंद्रपूरच्या महाकालीची लोकपरंपरा माय धुरपता' हा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ संजीव भागवत यांनी लिहिला असून हा ग्रंथ मंडळाकडून प्रकाशित केला जात आहे. मातृदेवता आणि त्यांचे अस्तित्व सर्वसामान्यांमध्ये अजूनही कसे अबाधित आहे याचा दाखला हा ग्रंथ देतो. लोकसाहित्याचे अभ्यासक, संशोधक यांच्यासाठी हा ग्रंथ दिशादर्शक असा आहे. मंडळामार्फत प्रकाशित होत असलेल्या अन्य महत्त्वपूर्ण पुस्तकांमध्ये महाराष्ट्राच्या भौतिक प्रगतीबरोबरच भाषा, साहित्य, कलाकल्पना, वस्त्रप्रारणे, खाद्याभिरुची, नितीसंकल्पनांचा आशय केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्राचा विस्तृत विवरणात्मक असा सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास मांडणारा महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास' (खंड-२) १९०१-१९५० (भाग-१ व भाग-२) हा रमेश वरखेडे यांनी लिहिलेला ग्रंथ, कै.प्राचार्य रामदास डांगे व कार्यकारी संपादक श्रीमती सुप्रिया महाजन यांनी संपादित केलेल्या मराठी व्युत्पत्तिकोश' हे पुस्तक, श्रीमती मंगला वरखेडे यांनी संपादित केलेल्या अक्षरबालवाङ्मय' या प्रकल्पातील तिसरा खंड भ्रमणगाथा' हा खंड, श्री बाळकोबा नरहर भावे (बाळकोबा भावे) यांचे समग्र वाङ्मय चार खंडात प्रकाशित करण्याचा प्रकल्प मंडळाने पूर्ण केला असून डॉ.विश्वास पाटील यांनी संपादन केलेल्या या प्रकल्पातील खंड-३ आणि खंड-४ चा समावेश आहे. महाराष्ट्राचे शिल्पकार' या चरित्रमालेअंतर्गत यापूर्वी प्रकाशित झालेले क्रांतिसिंह नाना पाटील यांचे पुनर्मुद्रित चरित्र, गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र, यापूर्वी प्रकाशित झालेले स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पुनर्मुद्रित चरित्र, कस्तुरबा गांधी जीवन चरित्र', जगन्नाथ तथा नाना शंकरशेट यांचे चरित्र, श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांचे चरित्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र, डॉ.पतंगराव कदम यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची ओळख करुन देणारे चरित्र, गौतमी माहात्म्य व तिच्या अष्टांग स्थानांचा सांस्कृतिक अभ्यास' या त्रिखंडात्मक प्रकल्पांतर्गत भाग-२ अष्टांगांचा अभ्यास' व भाग-३ 'गोदा संस्कृती' हे दोन महत्त्वपूर्ण खंड, याचबरोबरच मंडळाच्यावतीने यापूर्वी प्रकाशित झालेली माणसाचा मेंदू व त्याचे कार्य', खगोलशास्त्राचे विश्व, स्वातंत्र्याविषयी, अभिनय साधना, बोस्तान, यशोधन, मराठी शब्दकोश, पोर्तुगीज-मराठा संबंध, तमिळ भाषा प्रवेश, गजाआडच्या कविता व उर्दू-मराठी शब्दकोश इत्यादी अशी मुद्रित व पुनर्मुद्रित मिळून ३९ मौलिक पुस्तके वाचकांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. मंडळाच्या या पुस्तकाच्या माध्यमातून एकूणच मौलिक ग्रंथऐवज वाचकांना उपलब्ध होत असल्याची भावना डॉ.मोरे यांनी व्यक्त केली आहे.

## आरोग्य विभागातील १४४६ वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पदस्थापनेचे ऑनलाईन आदेश

### सामान्य नागरिकांना वेळेवर दर्जेदार आरोग्य सेवा देण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आवाहन!



**मुंबई/प्रतिनिधी**

आरोग्य विभागाच्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी गट-अ' पदाची भरती प्रकिया पूर्ण करण्यात आली. विधानभवनात मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते १४४६ एमबीबीएस डॉक्टरांना पदस्थापनेचे आदेश ऑनलाईन देण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत तसेच मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. आरोग्य विभागाने युद्ध पातळीवर ही भरती प्रक्रिया यशस्वीपणे राबविली. मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांची भरती झाली असून त्यामाध्यमातून सामान्य नागरिकांना वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यात यावी, असे आवाहन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी गट-अ' या संवर्गातील १७२९ रिक्त पदांसाठी एमबीबीएस व बीएएमएस उमेदवारांचे एकूण २९ हजार ५५६ अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारे प्राप्त झाले होते. ६५७५ एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांनी अर्ज केले होते. एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जाची छाननी करुन अंतिम गुणवत्ता यादीनुसार १४४६ एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. त्यांना पदस्थापनेचे आदेश देण्यात आले.

वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील १७२९ रिक्त पदे नामनिर्देशनाने भरण्याबाबत शासनाने ३० जानेवारी २०२४ रोजी मान्यता दिली होती. पदभरती प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले होते. त्यानंतर छाननी प्रक्रीया पूर्ण करून आदेशही देण्यात आले. अत्यंत कमी दिवसात ही प्रक्रिया पूर्ण करून वैद्यकीय अधिकाऱ्यांना तात्काळ नियुक्तीसाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करण्यात आले. विधानभवनात झालेल्या या कार्यक्रमाला आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर तसेच आरोग्य विभागातील अधिकारी उपस्थित होते.

## धान उत्पादकांना प्रती हेक्टरी २० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान

**मुंबई/प्रतिनिधी**

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरीप पणन हंगाम सन २०२३-२४ मध्ये केंद्र शासनाने मंजूर केलेल्या हमीभावा व्यतिरिक्त, नोंदणीकृत शेतकऱ्यांना धान उत्पादनाकरिता त्यांच्या धान लागवडीखालील जमीनधारणेनुसार प्रती हेक्टरी २० हजार रुपये दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. हे अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येणार असल्याबाबतचा शासन निर्णय अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने आज काढला केला आहे. या शासन निर्णयानुसार हे अतिरिक्त प्रोत्साहनपर अनुदान फक्त पणन हंगाम सन २०२३-२४ मधील खरीप धान पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना लागू राहील. खरीप पणन हंगाम सन २०२३-२४ मधील किमान आधारभूत किंमतीवर प्रोत्साहनपर अनुदान द्यायचे असल्याने पणन हंगाम सन २०२३-२४ साठी धान, भरडधान्य खरेदीबाबतच्या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांनी सर्व अटी व शर्तीनुसारच नोंदणी झाली असल्याची दक्षता घ्यावी. हे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे असणार आहे. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत नोदंणीकृत शेतकऱ्यांपैकी प्रत्यक्ष पेरणी केलेल्या क्षेत्राची ई-पीक पहाणीद्वारे खातरजमा करून जमिनीच्या सातबारा उताऱ्यावरील क्षेत्रानुसार त्या प्रमाणात संबंधित शेतकऱ्याला लाभ अनुज्ञेय राहील. शेतकऱ्यांना (धान विक्री केली असो वा नसो) धान उत्पादनाकरिता प्रती हेक्टरी २० हजार रुपये प्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान थेट लाभ हस्तांतरण (DBT) माध्यमातून वाटप करण्यात येणार आहे. धान उत्पादक हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळ या दोन अभिकर्ता संस्थांकडून सुरू केलेल्या कोणत्याही खरेदी केंद्रावर नोंदणीकृत असावा. प्रोत्साहनपर अनुदानासाठी शेतकऱ्यांनी त्यांचे धान अभिकर्ता संस्थांना विक्री करणे बंधनकारक नाही. ई-पीक पहाणी पद्वारे संकलीत माहितीच्या आधारे सात बारा उताऱ्यावरील धान लागवडीच्या जमिनीच्या क्षेत्रफळानुसार प्रोस्ताहनपर अनुदान निश्चित करण्यात येईल. एखादा शेतकरी दोन्ही अभिकर्ता संस्थांकडे नोंदणीकृत असल्यास त्याच्या एकूण जमीन धारणेनुसार (दोन हेक्टरच्या मर्यादेत) त्यास प्रोत्साहनपर अनुदान देय राहील.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

04 TO 10 MARCH 2024 - Page 5 (CRIME SANDHYA)8315:Layout 1 3/2/2024 9:51 PM Page 1



# भुईगावात स्वामी समर्थांच्या आणि बालयोगींच्या दर्शनसमयी स्पंदने अनुभवली –हभप प्रमोद महाराज




**वसई/प्रतिनिधी**

स्वामी समर्थांच्या व बालयोगींच्या दर्शनसमयी ईश्वरी शक्तींची स्पंदने अनुभवली असा अनुभव भुईगावातील स्वामी समर्थ मठाचे नुतन स्वामी भवनाचे भक्तार्पण बालयोगी श्रीसदानंद महाराजांच्या हस्ते संपन्न झालेल्या सोहळ्यात ह.भ प. प्रमोद महाराज जगताप यांनी कथन केला. या समारंभाचे अध्यक्षस्थान बबनशेठ नाईक यांनी भुषविले. यावेळी व्यासपीठावर अभिषेक निकम, समर्थ मठाचे मठाधिपती संदिप म्हात्रे तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी सुलभा म्हात्रे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रमोद महाराज पुढे म्हणाले, देव समजण्यासाठी माणसाने प्रथम स्वतःलाच समजून घेतले पाहिजे. गीतेत श्रीभगवान कृष्णाने स्पस्ष्टच सांगीतले आहे, जीव हा माझाच अंश आहे. दादा महाराज सातारकरांनी अधिकच स्पष्ट केले आहे. ते म्हणाले, जीव हा देवाचा अंश असल्याने तो देवाचा वंशच आहे असे म्हणत ईश्वरी शक्तींची तीन गोष्टींतून प्रचिती येते. जीव जो कर्मानुसार जन्म घेतो, ज्ञानरुपाने देव प्रकट होतो, तर संत प्रेमाचे, दयेचे रुप होय असे ते म्हणाले. ज्ञानेश्वर महाराज जन्मता:च ज्ञान घेवून प्रकट झाले. अक्कल म्हणजे सद्बुद्धी तथा कोट म्हणजे कोटीच्या कोटी जीवांपैकी भवसागर पार करून जन्मलेले संत होय. म्हणून स्वामी समर्थांचे निवासस्थान अक्कलकोट, पण ते भक्तांच्या भक्तीने जिथे तिथे प्रकट होतात. आता आपल्या भुईगावात प्रकट झाले आहेत. मठाधिपती संदिप म्हात्रे यांनी आपल्या प्रास्ताविकात मठाच्या कार्याची सविस्तर माहिती दिली आणि सहाय्य करणाऱ्या भक्तांचे आभार मानले. आपल्या अध्यक्षीय भाषणात बबनशेठ नाईक व संदिप म्हात्रे यांनी अलौकीक कार्य करून भुईगावाचा लौकिक सर्वदूर पसरविल्याबद्दल त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली. यावेळी स्वामीभवनाच्या निर्माण कार्यात सहकार्य करणाऱ्या व सोहळ्यात उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय नागरिकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. सोहळ्याचे सुत्रसंचलन अश्विनीताई भोईर व नारायणराव नाईक यांनी केले.

# वसई रेल्वेवरील अंबाडी पूल जीर्ण झाल्याने निष्कासित करणार

**वसई/प्रतिनिधी**



पन्नास वर्षांहून अधिक जुना झालेला वसई रेल्वेवरील अंबाडी पूल जीर्ण झाल्याने निष्कासित केला जाणार आहे. त्या जागी आता नवीन पुलाची उभारणी केली जाणार आहे. त्यामुळे सोमवार पासून हा रेल्वे पूल बंद करण्यात आला आहे. वसई शहराच्या पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा जूना अंबाडी पूल आहे. हा पूल ६ मीटर रूंद आणि १६० मीटर एवढा लांब आहे. लोखंडाचा वापर करून या पूलाची उभारणी करण्यात आली आहे. ५५ वर्षापेक्षा अधिक जुन्या असलेल्या या पूलावरून वाहनांची ये-जा होत असते. हा पूल जुना झाल्याने त्याला ठिक ठिकाणी तडे गेले होते. त्यामुळे पर्याय म्हणून नवीन पूल बांधण्यात आला आहे. २०१९ पासून नवीन पूल वापरात आहे. जुना पूल ही वाहतुकीला खुला राहावा यासाठी सहा वर्षांपूर्वी रेल्वेने या पुलाची दुरूस्ती केली होती. मात्र पुलाची क्षमता लक्षात घेता या पुलाच्या दोन्ही बाजूने लोखंडी कमानी उभारुन केवळ हलक्या वाहनांच्या वाहतुकीला सुरू ठेवण्यात आला होता. दिवसेंदिवस या पुलाची अवस्था बिकट होत असल्याने रेल्वेने या पुलाचे सर्वेक्षण व लेखापरीक्षण करून हा पूल आता वाहतुकीला धोकादायक ठरू शकतो. यासाठी आता जुना अंबाडी पूल निष्कासित करण्याचा निर्णय घेतला आहे. हा पूल पाडून त्या ठिकाणी नवीन पुलाची उभारणी केली जाणार असल्याची माहिती रेल्वेने दिली आहे. त्यासाठी रेल्वे पुलाच्या दोन्ही बाजूने पत्र्याचे बेरिगेट तयार करून लावून सोमवार पासून हा पूल वाहतुकीला बंद करण्यात आल्याचा सूचना फलक लावण्यात आला आहे. वसईत वाहनांची संख्या ही बेसुमार वाढली आहे. त्यामुळे वसई पूर्व व पश्चिम असा प्रवास करणाऱ्या वाहनचालकांचू संख्या अधिक आहे. आता जुना अंबाडी पूल वाहतुकीला बंद झाल्याने आता सर्व वाहने ही थेट नवीन पुलावरूनच ये जा करणार आहेत. त्यामुळे या पुलावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. रेल्वेने या पुलाचा संरचनात्मक पाहणी अहवाल तयार केला करून हा पूल कमकुवत असून त्याच्या दुरूस्तीसाठी सुमारे ७ कोटींचा खर्च अपेक्षित असल्याचे रेल्वेने वसई विरार महापालिकेला सांगितले होते. मात्र दुरुस्तीनंतर या पुलावरून अवजड वाहतूक होणार नसल्याने महापालिकेने नवीन पूल उभारण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या सेतू भारतम या योजनेअंतर्गत जूना पूल पाडून त्या ठिकाणी नवीन पूल उभारला जाणार आहे. यासाठी महापालिकेने प्रस्ताव सादर केला आहे.

## स्मार्ट अचीवर्स कोचिंग क्लासेसमध्ये विज्ञान प्रदर्शन संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी देवणी येथील स्मार्ट अचिवर्स कोचिंग क्लासेस येथे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात क्लासेसचे अनेक विद्यार्थी विविध प्रयोग घेवून सहभागी झाले होते. क्लासेच्या विद्यार्थ्यांची बौधिक कामगिरि पाहण्यासाठी आणि त्यांच्या हुशारीचे कौतुक करण्यासाठी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कै. रसिका महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा ग्रंथपाल डॉ. शिवाजी सोनटक्के उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आखील बुद्रे उपस्थित होते. विज्ञान प्रदर्शनात प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या प्रयोगास मान्यवरांच्या शुभहस्ते पारितोषिके देण्यात आली. तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देवून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क्लासेसचे संचालक सरफराज मंगरुळे यांनी आभार प्रदर्शन केले.

# कृत्रिम भित्तिका समुद्रात सोडणारी बोट सातपाटीच्या खडकावर अडकली

**पालघर/प्रतिनिधी**



समुद्र किनाऱ्याजवळ व कमी खोलीच्या ठिकाणी माशांना प्रजनन करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने कृत्रिम भित्तिका (म्युरल) समुद्रात सोडण्याची योजना आखली असून या योजनेमध्ये सिमेंटच्या भित्तिका सोडणारी बोट सातपाटी समोरील खडकावर अडकली. माशांना प्रजननासाठी अनुकूल वातावरण निर्माण व्हावे म्हणून खाडी मुखाच्या जवळपास कृत्रिम परिस्थिती निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने ही योजना देशभरात राबवित असून त्याची अंमलबजावणी राज्य सरकार करीत आहे. त्या अनुषंगाने सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे व पालघर या जिल्ह्याच्या यापूर्वी अभ्यासलेल्या ठिकाणी कृत्रिम भित्तिका समुद्रतळावर सोडण्याची योजना आहे. ठाणे जिल्ह्याच्या उत्तन व पालघर जिल्ह्याच्या वसई, अर्नाळा भागात कृत्रिम भित्तिका समुद्र तळावर सोडण्याचे काम केल्यानंतर ही बोट सातपाटी जवळ आली असता नौकानयन करणाऱ्या तांडेलला खडकाचा अंदाज नसल्याने ही बोट खडकात अडकली आहे. सायंकाळी ५.३० वाजल्याच्या सुमारास ही घटना घडल्याचे स्थानिक मच्छीमारांनी सांगितले उदाहरणाचे पाणी आल्यानंतर समुद्रात बोट पुन्हा सोडण्यात येईल असे सांगण्यात आले. यासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाचे सहसंचालक दिनेश पाटील यांच्याशी संपर्क साधला असता आठ ते दहा मीटर खोली असणाऱ्या समुद्र तळावर कृत्रिम भित्तिका समुद्रात सोडण्याची योजना असून या योजनेमध्ये अंतर्गत काम करणाऱ्या बोटचालकाला सातपाटी जवळील भौगोलिक परिस्थितीची माहिती नसल्याने खडकात अडकल्याचे सांगितले. कृत्रिम भित्तिका समुद्र तळावर सोडण्याचे काम शासकीय योजनेअंतर्गत असून यामध्ये कोणताही घातपात नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर सातपाटी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी देखील घटनास्थळाला भेट दिली.

## स्मार्ट अचीवर्स कोचिंग क्लासेसमध्ये विज्ञान प्रदर्शन संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी देवणी येथील स्मार्ट अचिवर्स कोचिंग क्लासेस येथे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात क्लासेसचे अनेक विद्यार्थी विविध प्रयोग घेवून सहभागी झाले होते. क्लासेच्या विद्यार्थ्यांची बौधिक कामगिरि पाहण्यासाठी आणि त्यांच्या हुशारीचे कौतुक करण्यासाठी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कै. रसिका महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा ग्रंथपाल डॉ. शिवाजी सोनटक्के उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आखील बुद्रे उपस्थित होते. विज्ञान प्रदर्शनात प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या प्रयोगास मान्यवरांच्या शुभहस्ते पारितोषिके देण्यात आली. तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देवून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क्लासेसचे संचालक सरफराज मंगरुळे यांनी आभार प्रदर्शन केले.

# नेकनाळ येथे उपेक्षित समाजाला तहसिल कार्यालयाकडून विविध प्रमाणपत्राचे वाटप

**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील नेकनाळ येथील उपेक्षित विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील ऊसतोड कामगार व तसेच सतत भटकंती करणाऱ्या गरीब लोकांना मूलभूत प्रमाणपत्र वाटप केल्याची माहिती नेकनाळ सज्जाचे तलाठी तथा तलाठी संघटनेचे देवणी तालुकाध्यक्ष अध्यक्ष गोपाळ बिरादार यांनी 'क्राईम संध्या'शी बोलताना सांगितले. वरील भटकंती करणाऱ्या समाजाला भविष्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यात येत आहेत. तलाठी गोपाळ बिरादार यांनी तहसीलदार गजानन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष कॉम्प लावून आधारकार्ड, राशन कॉर्ड सह अनेक प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या प्रमाणे विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील समाजाचे प्रमाण लक्षणीय आहे सतत्याच्या भटकंती मुळे या प्रवर्गातील समाजाला मूलभूत शासकीय दस्तऐवज मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण



होत आहेत. या समाजातील लोकांकडे प्रमाणपत्र नाहीत देवणी तहसील कार्यालयात महसूल विभागाच्या कर्मचारी अधिकारी यांनी विशेष कॅम्प लावून प्रत्येक तांडा वस्तीवर जाऊन विशेष मोहीम राबविली जात आहे. प्रमाणपत्रपासून वंचित असणाऱ्या लोकांना तात्काळ प्रमाणपत्र देण्यात येत असून ही मोहीम यशस्वीरित्या राबवीण्यासाठी तलाठी संघटनेचे अध्यक्ष गोपाळराव बिरादार ग्रामसेवक ईश्वर मुरके तहसील कार्यालयातील पेशकार रितेश कवरे कॉम्प्युटर ऑफरेटर दत्ता काकनाळे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी गावातील नागरिकानी सहकार्य केले

## ट्रेलरच्या विचित्र अपघातात चालकाचा मृत्यू

**पालघर/प्रतिनिधी**

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर ट्रेलरचा विचित्र असा अपघात घडला आहे. या ट्रेलरमधून वाहतूक होत असलेल्या लोखंडी पट्ट्या केबिनमध्ये घुसून त्याखाली दबल्याने ट्रेलर चालकाचा मृत्यू झाला आहे. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर ट्रेलरमधून अवजड लोखंडी पट्ट्यांची वाहतूक करणारा ट्रेलर मुंबईच्या दिशेने निघाला होता. राष्ट्रीय महामार्गावर ट्रेलर पुढे असलेल्या एका वाहनाने अचानक ब्रेक दाबला. त्यामुळे या ट्रेलर चालकाने देखील आपल्या ट्रेलरचा ब्रेक दाबला. मात्र यावेळी ट्रेलरमधून वाहतूक होत असलेल्या अवजड लोखंडी पट्ट्यांपैकी सात ते आठ लोखंडी पट्ट्या ट्रेलरच्या केबिनपर्यंत पुढे घुसल्या. अवजड लोखंडी पट्ट्या चालकाच्या केबिनपर्यंत आत घुसल्याने लोखंडी पट्ट्यांखाली दबून ट्रेलर चालकाचा जागीच मृत्यू झाला. राष्ट्रीय महामार्गावर दुपारच्या सुमारास धानिवरी गावाच्या हद्दीत तुलसी हॉटेल समोर हा भीषण अपघात घडला आहे. या अपघातानंतर महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी देखील झाली होती. अपघाताच्या घटनेची माहिती मिळताच महामार्ग मदत केंद्र आणि कासा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातानंतर केबिनमध्ये अडकलेल्या ट्रेलर चालकाचा मृतदेह क्रेनच्या साहाय्याने लोखंडी पट्ट्या बाजूला सारून केबिनमधून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला सारून वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

## कै.रसिका महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन



**देवणी/प्रतिनिधी**

कै. रसिका महाविद्यालय, देवणी येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ शिवाजी सोनटक्के यांच्या सह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. या स्नेहसंमेलनामध्ये आनंदनगरी मध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. तसेच प्रकाश भालके, अनिल कोनाळे, परमेश्वर रणदिवे, साहिल चिद्रेवार, दिव्या तादलापुरे, अंजली स्वामी, पृथ्वीराज कदम, बुद्धीराज शिंगे, हरिओम लांडगे या विद्यार्थ्यांनी आजच्या राजकीय परिस्थितीवर मार्मिक भाष्य करणारे 'राजाची कमाल प्रधानाची धमाल' हे विडंबनात्मक नाटक सादर केले. तसेच जागतिकीकरणाच्या काळात सामान्य माणसाची कशी फसवणूक होते व या फसवणुकीपासून सावधान राहण्यासाठी नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी यावर आधारित 'जागो ग्राहक जागो' हे मार्मिक नाटक सादर केले. विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम अंतर्गत मराठी, हिंदी काव्यवाचन, वैयक्तिक व समूह नृत्य इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. हे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न होण्यासाठी प्रा.डॉ. सुदर्शन पेडगे, प्रा. डॉ. गोपाल सोमानी, प्रा. डॉ.महादेव टेंकाळे, प्रा.डॉ. सुलोचना डेंगाळे, प्रा. डॉ. अंकुश भास्कर, प्रा. धनराज बिराजदार यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रयोगशील शेतकरी अनिल पाटील यांना कृषीरत्न पुरस्कार जाहीर

वाडा: वाडा तालुक्यातील प्रयोगशील शेतकरी अनिल नारायण पाटील यांना महाराष्ट्र शासनाचा कृषि विभागातील मानाचा डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांनी कृषि क्षेत्रामध्ये दिलेल्या आपल्या योगदानाची, मेहनतीची ही पोहचपावतीच म्हणावी लागेल, सदर बाब ही सर्वासाठी अभिमानाची, आनंदाची आहे. कृषीरत्न शेतकरी अनिल पाटील याची भेट घेऊन त्यांना व परिवारास कृषि विभागाच्या वतीने शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले, यावेळी अनिल पाटील यांनी मनोगत मांडताना त्यांना आपल्या प्रवासात परिवाराची व कृषि विभागाची साथ नेहमी भेटल्याचे सांगत हा पुरस्कार आपल्या सर्वाचा असल्याचे मत व्यक्त केले आणि आपल्यावर अजून जबाबदारी वाढल्याचे म्हणत कृषि विभागाचे जाहीर आभार मानले. सदर वेळी अनिल नारायण पाटील व परिवार, उपविभागीय कृषि अधिकारी सोमनाथ गावडे, तालुका कृषि अधिकारी सुनील पारधी, कृषि पर्यवेक्षक, राजेश संखे, संजय घरत, एस.आर. पाटील, कृषि सहाय्यक मिकीत पिंपळे व रामदास बात्रा उपस्थित होते.

## विकसीत भारत संकल्प यात्रेला नागरिकांचा प्रतिसाद!

**वसई/प्रतिनिधी**



देशभरात सुरू असलेल्या विकसीत भारत संकल्प यात्रेला वसईत नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. नागरिकांना केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती व्हावी व लोकांनी या योजनांचा लाभ कशा प्रकारे घ्यावा यासाठी ही यात्रा सुरू करण्यात आली होती. २९ नोव्हेंबर २०२३ रोजी जूचंद्र पासून पहिल्या टप्प्यात विकसीत भारत संकल्प यात्रेचा रथ ४९ विविध ठिकाणी थांबला. तर दुसऱ्या टप्प्यात ६ ते २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत पेल्हार ते उमेळा दरम्यान ४८ ठिकाणांवर हा रथ थांबला, तर उमेळा येथे या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. प्रत्येक ठिकाणी १५० हुन अधिक नागरिकांनी विविध योजनांचा लाभ घेतल्याचे डिस्ट्रिक्ट नोडल अधिकारी दिग्विजय सिंग व आर.जे. सावे यांनी सांगितले. वसई विरार शहर महापालिकेकडून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. भाजपा केरळ प्रकोष्ट महाराष्ट्रचे संयोजक उत्तम कुमार याबाबत बोलताना म्हणाले, या रथ यात्रेमुळे आज वसई तालुक्यातील अनेक नागरिकांना मोदी सरकारच्या योजनांचे महत्त्व समजले व त्यांनी उत्स्फूर्तपणे त्याचा लाभ घेतला असे म्हणत, वसई-विरार महापालिकेकडून केंद्र सरकारच्या अनेक योजना मागच्या काळात नागरिकांपर्यंत पोहोचवल्या जात नव्हत्या. उदाहरण द्यायचे झाल्यास, आयुष्यमान भारत योजनेपासून पालिकेच्या नाकारतेपणामूळे अनेक गरजू वंचित राहिले असे ते म्हणाले. या रथ यात्रेच्या माध्यमातून आयुष्यमान भारत, पीएम स्वनिधी, उज्वला भारत, आधार अपडेशन, मेडिकल कॅम्प आदी योजनांचा नागरिकांना लाभ घेता आला. याबद्दल उत्तम कुमार यांनी केंद्रातील मोदी सरकारचे आभार मानले आहेत.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक २२७ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी, पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता 'ब-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०२ (दोन) काम समाविष्ट आहे.

टिप : या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये (जी.एस.टी.वगळून) | लेखाशिर्ष |
| --- | --- | --- | --- |
| १. | पालघर तालुक्यातील उनभाट (चिरभाट) समुद्रकिनारी पोहच रस्ता व भराव करून पार्किंग व्यवस्था करणे. ता. जि. पालघर | रु. ४३३४६४१/- | ३४५२ पर्यटन विकास |
| २. | पालघर तालुक्यातील उनभाट येथे समुद्रकिनारी पाथवे तयार करणे. ता.जि.पालघर | रु. ६६२७९४७/- | ३४५२ पर्यटन विकास |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरील कामाची ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. २९/०२/२०२४ ते दि. ०७/०३/२०२४ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. ०९/०३/२०२१ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर

**जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/२८८२**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४,
दिनांक : २७/०२/२०२४

सही/-
**(स.प्र. पाटील)**
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

**विमाका/कोवि/२०२३-२०२४/४४२**

पान ३ वरून....

## पालघर पुन्हा एकदा दुहेरी...

पोलिसांची पथके स्थानिकांसह रवाना करण्यात आली. हत्या करणारा आरोपी कुडण येथे असलेल्या तलावाच्या दलदल परिसरात लपून बसल्याचे माहिती समोर आली. त्यानंतर पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने या हत्या करणाऱ्या आरोपीला गुरुवारी रात्री साडे अकरा वाजताच्या सुमारास अटक केली. दोन व्यक्तींची निर्घृण करणारा व्यक्ती माथेफिरू असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून गेल्या दोन दिवसांपासून तो गावात फिरत असल्याचे देखील कळते. अटक आरोपीची चौकशी पोलिसांमार्फत सुरू करण्यात आली असून आरोपी सध्या कोणतीही माहिती देत नसल्याचे कळते. या प्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत. काही वर्षापूर्वी पालघरमध्ये २ साधू आणि त्याच्या वाहन चालकाची हत्या झाली होती. त्या हत्याकांडाने संपूर्ण देश हादरला होता. अजूनही ते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मात्र त्याची कारणे वेगळी होती. पण वरिष्ठ नागरिकांच्या हत्येचे हे प्रकरण वेगळे आहे. ते प्रकरण मॉबलिन्चीनगचे होते, तर यात एकच आरोपी असल्याचे सध्या तरी निष्पन झाले आहे. त्यामुळे या हत्याकांडाचे गुढ वाढलेले आहे. यथावकाश यातील माहिती बाहेर येईल, पण पालघर जिल्ह्यात अशा प्रकारच्या घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न मात्र ऐरणीवर आलेला आही. कारण २ जेष्ठ नागरिकांच्या हत्या झाल्या आहेत. त्यामुळे जेष्ठ नागरिकांना टार्गेट करणारा हा सिरीयल किलर आहे कि या हत्या सुनियोजित कटाचा एक भाग आहेत हे शोधून काढण्याचे अवघड आव्हान आता पोलिसांच्या समोर आहे. पण पोलीस मात्र माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याने लोकांच्या मनात पोलिसांविषयी सुद्धा संशय निर्माण झाला आहे. कारण पालघर हत्याकांडात जशी पोलिसांची भूमिका संशयास्पद होती तशी या प्रकरणात तर नाही ना? असे लोक विचारात आहेत.

## अनैतिक संबंधात शरीर सुखाचा...

नाही, असे का? हा मोठाच प्रश्न होता. याचे उत्तर मिळाले आणि रहस्यावरचा पडदा बाजूला झाला. बेलवंडी पोलीस स्टेशनला सध्या पोलीस निरीक्षकभंडारे हे कार्यरत आहेत. घटनेचीखबर मिळताच पोलीस निरीक्षकभंडारे तात्काळ कोथुळ येथीलशेळके यांच्या घरी पोहोचले. बेलवंडी पोलिसांनी पोलीस निरीक्षक भंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळाचा तसेच मयताचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासण्यासाठी श्रीगोंदा येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. दरम्यान बेलवंडी पोलिसांनी मयत योगेश शेळके यांची पत्नी आरती शेळके हिची रितसर फिर्याद घेवून अज्ञात व्यक्तींविरुद्ध बेलवंडी पोलीस स्टेशनला गुन्हा रजि.नं. ३७/२०२४ भा.दं.वि. कलम ३०२, ४५२, ५०६, ३४ आर्म अॅक्ट ४/२५ प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गंभीर घटनेची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आली. बेलवंडी पोलिसांनी तपासाला सुरूवात केली होतीच. दरम्यान घटना गंभीर स्वरूपाची असल्याने पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी घटनास्थळास भेट देवून स्थानिक गुन्हा अन्वेषणचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना आरोपींचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेण्याच्या सुचना केल्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक तुषार धाकराव, सहाय्यक फौजदार बबन मखरे अशा पोलीस अधिकारी व अंमलदार यांची दोन विशेष पथके तयार करून सदरचा गुन्हा उथडकीस आणण्याबाबत त्यांना सुचना देवून पथके रवाना करण्यात आली. पारनेर तालुक्यातील हंगा पळवे गावातील शेळके कुटुंब हे शेती करण्यासाठी कोथुळ (ता. श्रीगोंदा) या गावात आले होते. योगेश सुभाष शेळके (वय ३३) यांनी सुमारे १८ एकर क्षेत्रपाच वर्षापूर्वी विकत घेतले होते. शेती करण्यासाठी योगेश आपले वडील सुभाष शेळके आणि पत्नी आरतीसह याठिकाणी वास्तव्यास आले होते. योगेश यांना आई नाही. एक भाऊ आहे. सुमारे १० वर्षापूर्वी योगेश आणि आरतीचे लव्ह मॅरेज झाले होते. त्यांना एक मुलगा आणि मुलगी अशी दोन अपत्ये झाली. शेतीवाडी करून त्यांचा संसार सुखात चालला होता. काही वर्षापासून योगेशला त्याच्या दारूड्या मित्रांमुळे दारूचे व्यसन जडले होते. ही मंडळी संध्याकाळी हमखास योगेशच्या घरासमोर दारूची पार्टी करायची. त्यामध्ये गावातीलच रोहित साहेबराव लाटे (वय २४) हादेखील असायचा. रोहित हा पुण्यालाजावून भाजीपाल्याचा व्यवसाय करायचा. मात्र बऱ्याचदा तो योगेश शेळकेच्या पार्टीला असायचा. दारू पार्टीच्या निमित्ताने घरी येणाऱ्या रोहित लाटेची अलिकडे वर्दळ जरा जास्तच वाढली होती. येण्या-जाण्याच्या निमित्ताने तो आरतीला भेटत असे. त्यांचे आता आता चांगलेच मेतकूट जमले होते. सुमारे दीड वर्षापासून रोहित अन् आरतीमध्ये प्रेमाची गुटर्रगु सुरू झाले होते. ते दोघे संधी मिळेल तेंव्हाएकमेकांना भेटत असत. त्यादोघांच्या लफड्याची कुजबुजयोगेशला लागल्यामुळे तो दारूपिवून आरतीला शिवीगाळ अन्मारहाण करत असे. योगेशलाआपल्या संबंधाचा संशय आल्याने तो शिवीगाळ करून मारहाण करतो. याचं काहीतरी केलं पाहिजे, अशी चर्चा आता आरती व तिचा प्रियकररोहित लाटे यांच्यात होवू लागलीहोती. 'मीच करतो आता कायकरायचे ते' असे रोहित म्हणायचा.दोघांच्या संबंधात अडथळा ठरणारा योगेश यालाच या जगातून कायमच घालवायचा असा निर्धार त्या दोघांनी केला. रोहित लाटेचा पुणे येथे चांगलाच संपर्क असल्याने त्याने शोएब महंमद बादशहा (वय २२, रहाणार ट्रॉम्बे, मुंबई) विराज सतिश गाडे (वय १९, रा. सोलापूर बाजार कॅम्प, पुणे), आयुष शंभुसिंह ( वय १८), पृथ्वीराज अनिल साळवे (वय १९), अनिश सुरेंद्र धडे (वय १९, रहाणारा घोरपडे पेठ, पुणे) यांना योगेश शेळकेला मारण्यासाठी दीड लाख रूपयांची सुपारी दिली. आरती आणि रोहित लाटे या दोघांनी मात्र नामानिराळे रहायचे ठरले. मंगळवार दि. ३० जानेवारी २०२४ रोजी श्रीगोंदा तालुक्यातील कोथुळ येथील योगेश शेळकेच्या घरी मध्यरात्रीनंतर दोन वाजण्याच्या सुमारास कोणीतरी दरवाजावाजवल्याचा आवाज झाला.शेळके कुटुंबीय जेवणखाण करून गाढ निद्रेत असतांनाच हा आवाज आला होता. योगेश यांची पत्नी आरती हिने दरवाजा उघडला असता दरवाजासमोर चौघेजण सडपातळ इसम काळे कपडे परिधान केलेलेव तोंडाला कापड बांधलेले, हातात कोयता घेवून उभे असलेले दिसले. त्या सर्वानाब बघून आरतीआरडाओरडा करायला सुरूवात केली. त्यावेळी त्यांच्यापैकी एकानेआरतीच्या गळ्याला कोयता लावून 'तू काही बोललीस तर तुला मारून टाकीन' असा दम दिला. त्यातीलतिघेजण योगेश झोपलेल्या ठिकाणीगेले. त्यांनी काहीही न बोलताहातातील कोयत्याने योगेशच्यागळ्यावर, हाताच्या पंजावर, उजव्यापायावर वार करून गंभीर दुखापतकरून त्याचा खून केला. झोपेमध्ये झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने योगेश रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्यानंतर ते चौघेहीजण तेथून पळून गेले. शेळके कुटुंबातील आरडाओरडा ऐकून शेजार-पाजारचे लोक जमा झाले. त्यांनी पोलिसांनाफोन करताच काही वेळातच बेलवंडी पोलीस घटनास्थळी हजर झाले. ठसेतज्ञ अन् श्वानपथकालाही पाचारण करण्यात आले. हल्लेखोर दोन मोटरसायकलवरून आले होते. त्यामुळे श्वानानेरस्त्यापर्यतच माग काढला. बेलवंडी पोलिसांनी आरती शेळके हिची फिर्याद घेवून अज्ञात आरोपीविरूद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. एल.सी.बी.चे पथक पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली घटनास्थळावर पोहोचले. त्यांनी बारकाईने निरीक्षण केले असता 'घरात मयताची पत्नी, वडील, मुलगा, मुलगी' असे सर्वजण असतांना हल्लेखोरांनी फक्त एकावरच हल्ला करून ठार केले होते, त्यामुळे या घटनेबाबत संशयआला. त्यांनी त्यादृष्टीने तपासास सुरूवात केली. मयत योगेश शेळकेकाल घरापासून काही अंतरावर एका झाडाखाली दिवसभर आपल्या काही मित्रांसोबत दारू पित बसला होता, त्यामुळे या पार्टीत कोणाची भावना दुखावेल अशी भाषा योगेश वापरली काय? तसेच बोलतांना त्याच्याकडून एखादा वाईट शब्द गेला अन् त्यावरून घटना आहे का? याविषयी पोलिसांनी सखोल चौकशी केली. त्यावेळी त्यांना मयताची पत्नी आरती शेळके व रोहित लोटे यांच्यात प्रेमसंबंध असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी कोथळ गावातही सखोल चौकशी केली. त्यावेळी या गोष्टीला दुजोरा मिळाला. पोलिसांनी गावातील एका ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासलेअसता त्यात दोन दुचाकीवर काहीजण अवेळी जातांना दिसत आहेत. या सर्व गोष्टींचाखुलासा झाल्यानंतर पोलिसांचा फिर्यादी आरती शेळकेवरच संशय बळावला. तिच्या सांगण्यावरूनपोलिसांनी सुरूवातीला योगेश शेळकेबरोबर दारू पिणाऱ्या ४ तेजणांना ताब्यात घेतले. त्यावेळी तिने पोलिसांची दिशाभूल केली. पोलिसांना ती सांगत असलेल्या गोष्टीवर विश्वास बसत नव्हता. साधारण सुरूवातीचे दोन दिवस गावातून वेगवेगळी माहिती तसेच तांत्रिक विश्लेषण दरम्यान मयत योगेश शेळके याचा भाचा शुभम लगड याच्या मोबाईलवर रोहित साहेबराव लाटे (वय २३) याचा घटनेच्या दिवशी सकाळी कॉल आलेला दिसून आला. त्याप्रमाणे पथकाने पुणे येथे जावून रोहित लाटे याला विश्वासात घेवून त्याच्याकडे विचारपूस केली. त्यावेळी त्याने आरती व आपलेप्रेमसंबंध असल्याचे सांगितले. त्यावरून योगेश हा आरतीला शिवीगाळ करून मारहाण करायचा. पंधरा दिवसांपूर्वीच नियोजन करून अनिश सुरेंद्र धडे (वय १९) रा. पुणे याच्या मध्यस्थीने पृथ्वीराज अनिल साळवे (वय १९), विराज सतिशगाडे (वय १९), शोएब महंमद बादशह (वय २२) व आयुष शंभुसिंह (वय १८) यांना दीड लाख रूपयांची सुपारी देण्याचे कबुल करून त्यांच्या मदतीने दोन मोटरसायकलवर येवून खून केल्याचे त्याने सांगितले. रोहित लाटे आणि आरतीच्या संबंधाची कोणाला माहिती मिळू नये म्हणून स्नॅपचॅट या सोशल मिडीयापचा वापर करून ते संपर्क साधत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. एल.सी.बी.चे पोलीस दिनेश आहेर, बेलवंडीचे पोलीस निरीक्षक संतोष भंडारे यांच्या नेतृत्वाखाली, पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांतखैरे, उपअधीक्षक विवेकानंद वाखारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक तुषार धाकराव, सहाय्यक फौजदार बबन मखरे, सहाय्यक फौजदार उमाकांत गावडे, हेड कॉन्स्टेबल संभाजी कोतकर, बापूसाहेब फोलाणे,कॉन्स्टेबल रविंद्र कर्डीले, मच्छिंद्र बर्डे, अमोल कोतकर, रविंद्र घुंगासे, भाऊसाहेब काळे, रोहित मिसाळ आदींनी सर्व आरोपींना विविध ठिकाणावरून ताब्यात घेतले. या सर्वाना न्यायालयासमोर उभे केले असता त्यांना न्यायालयाने पोलीस कोठडी ठोठावली. अहमदनगर स्थानिक गुन्हे शाखेचे राहुरी येथील वकील दाम्पत्याचा खून करणारे तसेच कोथळी खून प्रकरणातील आरोपी उघडकीस आणल्याने त्यांना ३५ हजार रूपये रोख बक्षीस जाहिर करण्यात आले.

## ट्रकच्या धडकेत वयोवृद्ध पादचाऱ्याचा मृत्यू



**वाडा** : वाडा शहरातील खंडेश्वरीनाका येथे वयोवृद्ध पादचाऱ्याला ट्रकने धडक दिल्याने सदर इसम गंभीर जखमी झाला होता त्याला नागरिकांनी तातडीने वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले मात्र गंभीर दुखापत झाली असल्यामुळे उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. लाश्या धाकल खांडवी (७५) असे मयताचे नाव असून ते विक्रमगड तसलुक्यातील उटावली गावचे रहिवासी होते. ट्रकच्या धडकेत वयोवृद्धाचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे तर धडक देऊन पसार झालेल्या ट्रक वाडा पोलीसांनी तब्यात घेतला आहे. वाडा शहरतील खंडेश्वरी नाका ते परळी नाका हा रस्ता सिमेंट काँक्रिटचा व रुंद करण्यात आला असला तरी अनधिकृत फेरीवाले, टपरी, हाथगाडी व रस्त्याच्या दोन्ही बाजूने पार्किंग केलेल्या वाहणांमुळे वाहतूक कोंडी होत आहे, या वाहतूक कोंडीमुळे रस्त्यावरून चालणाऱ्यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. रस्त्यावर अतिक्रमण करून थाटलेली दुकाने हटविण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्वाना नोटीस बजावली होती मात्र कारवाई केली नसल्याने गुरुवारी भूमिपुत्र संघटनेच्या कार्यकर्त्यानी अधिकाऱ्यांना जाब विचारला असता त्यांनी सोमवार (दि.५मार्च) रोजी कारवाई करणार असल्याचे लेखी दिले आहे. आज झालेल्या वयोवृद्ध व्यक्तीच्या मृत्यूस जबाबदार कोण? असा सवाल करत अपघाताला जबाबदार असणाऱ्यांवर सदोस मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे.

पान ८ वरून....

## संकेत भोसले हत्या प्रकरणी न्याय ...

आरोपींना लवकरात लवकर अटक करून कठोर शिक्षा झाली पाहिजे. भिवंडीत शिवा बनसोडे, विकास कांबळे, विकी ढेपे या तरुणांची देखील हत्या झाली होती. या प्रकरणातील आरोपी निर्दोष सुटल्याने मयत तरुणांना आजही न्याय मिळाला नाही त्यामुळे जोपर्यत मयत संकेत भोसले त्याच्या परिवाराला न्याय मिळत नाही तोपर्यंत आंदोलन यापुढेही आंदोलन सुरूच ठेवणार असल्याची प्रतिक्रिया मोर्चाचे संयोजक अॅड.किरण चन्ने यांनी दिली आहे.

## सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित ...

लॅपटॉप व्हायरसच्या माध्यमातून डाटा ब्लॉक करून खंडणी उकळतात. तंत्रज्ञानाने जेवढ्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत, तेवढेच त्याचा दुरुपयोगही केला जात असल्याचे निदर्शनास येते. डिजिटल पेमेंट्सच्या बाबतीत होणारी आर्थिक लूट न दिसणारी असे असेही त्यांनी सांगितले. ऑनलाईन बँकिंगच्या माध्यमातून घडलेल्या लुटीच्या सायबर गुन्ह्यात पोलीस आणि संबंधितात ताळमेळ असणे खूप गरजेचे असते. ताळमेळ असेल तरच पैसे दोन तासात परत येऊ शकतात, अन्यथा परत येत नाहीत. वर्ष २०१७ मध्ये एकूण २०७१ कोटींचे डिजिटल पेमेंट्सचे व्यवहार झाले होते. तर २०२२-२०२३ पर्यंत हे व्यवहार १३ हजार ४६२ कोटी रुपयांचे झाले होते. एवढ्या मोठ्या आर्थिक व्यवहारात नक्कीच अनुचित गुन्हेही घडले, हे मान्यच करावे लागेल. प्रत्येक कार्ड, यूपीआय, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग मध्ये सायबर गुन्ह्याचे स्वरूप हे वेगवेगळे असते. ऑनलाईन शॉपिंगमध्ये तर समोरच्याला वेड्यात काढून फसवणूक केली जाते. आपल्याकडे गप्पा मारण्याला प्राधान्य देणारी मंडळी अधिक आहेत. यातून उपयोगात येणाऱ्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातूनही गंडवणूक केली जाते, हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. सायबर गुन्ह्यात आपले आधारकार्ड, आयकार्डचाही गैरवापर केला जाण्याची अथवा केला गेल्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण याबाबतीत सामान्य नागरिक आणखी म्हणावा तेवढा जागरूक झालेला नाही. सन २०२० मध्ये आपल्या देशात ५० हजार ३५ सायबर गुन्हे दाखल झाले होते. आता हा आकडा निश्र्चितच वाढणार आहे. ऑनलाईन शॉपिंगमध्ये एक हजार रुपयांची वस्तू पाच हजारांची असल्याचे दाखवून ती पन्नास टक्के सूट देऊन विकली जाते. म्हणजे हाही सायबर गुन्ह्याचाच एक प्रकार असल्याचे सांगून प्रा. नाईक यांनी नागरिकांना सजग राहणायचे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अॅड. महेश बामणकर यांनी केले. अॅड. जयश्रीताई पाटील यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. यावेळी अॅड. निलीमा वर्तक, अॅड. जयश्री अकोलकर, अॅड. बळवंत जाधव, नलिनी गावंडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अॅड. अण्णाराव पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड. तृप्ती इटकरी व अॅड. पल्लवी कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन अॅड. किरण चिंते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अॅड. सुरेखा जाकते, अॅड.अरुणा वाघमारे, अॅड. पूनम सुरकुटे, अॅड.सुनंदा इंगळे, अॅड.बबिता संकाये, अॅड. गिरवलकर यांसह वूमेन फेडरेशन व जिल्हा वकील मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## वाड्यातील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर...

विद्यामंदिर वाडा तालुका वाडा जिल्हा पालघर शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री सुनील दावा पाडवी यांनी तंबाखुमुक्त शाळांचे ९ निकष पूर्ण करून घेतली. सलाम मुंबई फाउंडेशन चे प्रतिनिधी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे पालघर जिल्हा संघटक मिलिंद रूपचंद पाटील, वाडा केंद्राचे केंद्रप्रमुख सोनवणे यांच्या मार्गदर्शनना खाली सर्व विद्यार्थ्याना तंबाखुमुक्तची शपथ हेमंत पाटील यांनी दिली. तंबाखू नियंत्रणावर आधारित उपक्रम राबविले. शाळेच्या १०० मी. यार्ड परिसरात तंबाखू विक्री व सेवन करणाऱ्या व्यक्तीला दंड आकारण्यात येईल. यावेळी शाळेच्या १०० यार्ड पर्यंत परिसर दिसेल असा पिवळ्या रंगाने रेखांकित करून तेथे तंबाखुमुक्त क्षेत्र असे नाव लिहून त्यांचा फोटो घेतला. यावेळी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. यावेळी संस्थेच्या सरचिटणीस विशाल कुलकर्णी, जगदीश चित्ते (कोषाध्यक्ष), तंबाखू मुक्त शाळा विभागाचे प्रमुख अविनाश निकम, सुनिल खेडकर, अर्चना सूर्यवंशी (उपमुख्याध्यापिका), सुमन सूर्यवंशी (पर्यवेक्षिका), मनोज भोये, प्रांजल भोईर, गणेश कुमावत, अनुराधा कुलकर्णी, रामकृष्ण लोहार, सुनिल भोये, योगेश विद्वांस फुलपागरे, राहुल पाटील, जितेंद्र जुलासिंग पाटील, वैष्णवी ठाकरे, अंकिता मगरे, वैशाली पाटील, योगिता बोरोले,सावनी गव्हाळे, शकुंतला चौधरी, तृप्ती वेखंडे, साक्षी ठाकरे, विशाखा घोडे आनंता लोखंडे,जुईली पाटील, भाग्येश निकम, ऋषिकेश पाटील, मयुरी बसवंत, उमेश मुंगे, विद्यार्थी प्रतिनिधी शर्वरी वेखंडे इत्यादींनी शाळा तंबाखूमुक्त होण्यासाठी विशेष योगदान दिले.

## बाळासाहेब थोरात व राहुल गांधीच्या ...

यात्रा भिवंडीत दाखल झाल्या नंतर रात्रीचा मुक्काम सोनाळे क्रीडांगणा वर करण्याचा विचार काँग्रेस पक्षाकडून घेतला असून त्यासाठी जागेची पाहणी केली जात आहे. विधानसभेच्या अधिवेशनाची सांगता होत असताना विधिमंडळ परिसरात काँग्रेसचे आमदार विश्वजित कदम यांच्या बाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वजित लवकरच तुझा मुहूर्त अडे वक्तव्य केले होते. याबाबत विचारले असता विधानमंडळामध्ये आम्ही सर्वच सहकारी एकत्रित वावरत असताना थट्टा मस्करी केली जाते. विश्वजीत कदम यांच्यासोबत झालेला प्रकार हा थट्टा मस्करी चा भाग होता.त्याला गांभीर्याने घेऊ नये अशी प्रतिक्रिया बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे.

## जैन चॅलेंज चषक तायक्कांडो स्पर्धेत ...

१७ वर्ष मुलांच्या गटात :- ३५ किलो आतील सोहम कोल्हे, ३८ किलो आतील सतीष क्षीरसागर, ४१ किलो आतील कविश जैन, ४५ किलो आतील मुकेश भोई, ४८ किलो आतील साई निळे, ५१ किलो राजरत्न गायकवाड, ५५ किलो आतील भावेश चौधरी, ५९ किलो आतील लोकेश महाजन, ६३ किलो आतील प्रबुद्ध तायडे, ६३ वरील प्रतिक वंजारी विजयी झालेत.

१७ वर्ष मुली :- ३२ किलो आतील गायत्री धनगर, ३५ किलो वैष्णवी जाधव, ३८ किलो प्राचल कोळी, ४२ किलो आतील कोमल गाढे, ४४ किलो आतील तनुजा राऊत, ४६ किलो आतील समृद्धी कुकरेजा, ४९ किलो आतील जागृती चौधरी, ५२ किलो आतील प्राप्ती गुगाले, ५५ किलो आतील इष्णवी भाऊका, ५५ वरील प्रेरणा जाधव यशस्वी झालेत. तर १४ वर्ष मुलांमध्ये अर्थव सोनार व मुलींमध्ये स्वाती चौधरी तर १७ वर्ष मुलांमध्ये सोहम कोल्हे व मुलींमध्ये प्राप्ती गुगाले यांना बेस्ट फायटर पुरस्काराने सन्मानित केले गेले. खेळाडूंना प्रशिक्षक जयेश बाविस्कर, जयेश कासार, जीवन महाजन, स्नेहल अट्रावलकर, सुनील मोरे, श्रीकृष्ण देवतवाल, योगिता सुतार, हरीभाऊ राऊत, शुभम शेटे, विजय चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा यशस्वीतेसाठी जयेश बाविस्कर, श्रेयांग खेकारे, दानिश तडवी, यश शिंदे, अमोल जाधव, निलेश पाटील, हिमांशू महाजन, ईश्वर क्षिरसागर, स्मिता काटकर, संतोषी, सन्नी सालीपुत्त यांनी सहकार्य केले. विजेते खेळाडूंना अध्यक्ष अतुल जैन, उपाध्यक्ष ललित पाटील, कोषाध्यक्ष सुरेश खैरनार, सहसचिव रवींद्र धर्माधिकारी, सचिव अजित घारगे, महेश घारगे, नरेंद्र महाजन, कृष्णकुमार तायडे यांनी शुभेच्छा दिल्यात.

## आ.कराड यांच्या प्रयत्नातून पानगावच्या ...

सर्वांगीण विकास व्हावा यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन पाठपुरावा केला होता. केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने नमो तीर्थस्थळ सुधार अभियानाच्या माध्यमातून राज्यातील ७३ ऐतिहासिक व पुरातन मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचा निर्णय घेतला. या योजनेत पानगाव येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा समावेश करण्यात आला होता. आ. रमेशआप्पा कराड यांनी ३१ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे मंत्रालयात पर्यटन विकास मंत्री मा. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांची भेट घेऊन पानगावच्या विठ्ठल मंदिर विकासासाठी निधी द्यावा, त्याचबरोबर मंदिर परिसराला भेट देण्याची विनंती केली. असता पानगावला येण्याचे निमंत्रण स्वीकारून मंत्री महोदयांनी या मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासाचा तातडीने विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.पानगाव येथील श्री विठ्ठल मंदिर जतन व दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करून पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालय यांच्याकडे संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचलनालय मुंबई यांनी १२ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या पत्रकान्वये प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली होती. मागील काळात छत्रपती संभाजी नगर येथे पार पडलेल्या मंत्रिमंडळ विशेष बैठकीत मराठवाडा विभागातील ऐतिहासिक वस्तूचे संवर्धन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार आणि पुरातत्व व वस्तू संग्रहालय संचालनालय यांनी शिफारस केल्यानुसार रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथील श्री विठ्ठल मंदिराचे जतन व दुरुस्ती कामासाठी ९ कोटी ३४ लक्ष ४९ हजार ९३४ रुपये खर्चास राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग मंत्रालयाने एक मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे.श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन आणि दुरुस्ती कामासाठी तब्बल साडेनऊ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे अनंत चव्हाण, सतीश आंबेकर, सुकेश भंडारे, गणेश तूरूप, श्रीकृष्ण जाधव, भागवत गीते, गोपाळ शेंडगे, प्रदिप कुलकर्णी, ईश्वर गुडे, चंद्रकांत आरडले, हरिकृष्ण गुर्ले, जगन्नाथ नरहारे, मारूती गालफाडे, जयराम कस्तूरे, बब्रूवान संपत्ते, सुर्यकांत गालफाडे, सिध्देश्वर व्यवहारे, नागनाथ फुले, बाबुराव कस्तूरे, योगिराज सिरसाट, अमर चव्हाण, शिला आचार्य, ललिता कांबळे, सुरेंद्र हरीदास, दत्तात्रय भंडारे, दत्ता आंबेकर, रमाकांत संपत्ते, अॅड. माधव गुडे, नाथराव गिते यांच्यासह पानगाव आणि परिसरातील अनेकांनी आभार व्यक्त केले आहेत.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अंतरंग...

तर Portrait Demo हा विषय स्वप्नील वेचलेकर यांनी घेतला. चारही कार्यशाळा मिळून सर्व वयोगटाच्या एकूण २००हून अधिक प्रशिक्षणार्थी यात सह भाग घेतला. सचिन गदगी यांचे मराठी स्टँड उप कॉमेडी मधून-लोकल, मुंबईकर आणि लोकल मुंबईकर हा विषय मांडला. यंदा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याने त्याचे अवचित्य साधून शिवराज्याभिषेक-एक नव्या युगाचा प्रारंभ या विषयवार व्याख्यान झाले. या महोत्सवात सचिन गाडगीया महोत्सवात वसईतील कलाकारांनी वैखरी-काव्यात्मक गीतांचा नादमय प्रवास हा कार्यक्रम सादर केला ज्यामध्ये वरदा ठोसर-ढापरे, अजिंक्य देवधर, निहार वर्तक, अमेय सातघरे आणि अधिराज कुरणे हे कलाकार होते. तर वादक म्हणून हृषिकेश गोवेरकर, भालचंद्र पाडेकर, कल्पेश कोशिंबे, अनंत जाधव यांनी वाद्यांचा सुंदर वाद्यांची ओळख करून दिली. महोत्सवाची सांगता ही युवा सतार वादक सारंग वेचलेकर आणि तबला वादक सरदार हर्मित सिंग यांच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या स्वर संवाद या कार्यक्रमाने झाली. संपूर्ण २ दिवसांच्या मोहितासावत एकूण ७०० हून अधिक प्रेक्षकांनी उपस्थिती लावली.

## भाईंदर येथे भंयकर अग्नितांडव...

याठिकाणी आहेत. पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास यातील काही झोपड्यांना आग लागली. अनेक झोपड्या प्लास्टिकच्या ताडपत्रीनी बांधल्या असल्यामुळे आग वेगाने पसरली. त्यात याठिकाणी असलेल्या गोदामात मोठ्या प्रमाणात भंगार समान, प्लास्टिक व बांबू असल्याने आगीने आणखी जास्त पेट घेतला. यावेळी झोपड्यांमधून असलेल्या काही गॅस सिलेंडरचे स्फोटही झाले. या स्फोटांचे आवाजही दूरपर्यंत ऐकू येत होते. आगीची माहिती मिळताच मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला. मात्र आगीने भीषण स्वरूप प्राप्त केल्याने ती आटोक्यात येत नव्हती. त्यातच झोपडपट्टी भागातील गल्ल्या अत्यंत अरुंद असल्याने मोठ्या अडचणींचा त्रास सहन करावा लागला. महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी आसपासच्या महापालिकांशी संपर्क साधला व त्यांचे अग्निशमन दलही पाचारण केले. त्यामुळे मुंबई महापालिकेचे ७, ठाणे महापालिकेचे ४ व वसई विरार महापालिकेचे ३ अग्निशमन बंब यासह एकंदर तब्बल २४ बंब व तेवढेच पाण्याचे टँकर आग विझवण्याचा काम करत होते.आग नियंत्रणात येत असतानाच अग्निशमन दलाने ढिगारे उपसण्यास सुरुवात केली त्यात दीपक चौरसिया यांचा मृतदेह आढळून आला. आगीत सुमारे ४० झोपड्या व गोदामे जाळून खाक झाली. यात अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर आले. आयुष्यभराची जमापुंजी आगीत भस्मसात झाल्याने आता पुढे काय असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. आगीत मृत्यू झालेले दीपक चौरसिया हे त्याच परिसरातच रहात होते. त्यांचे पानाचे दुकान होते. आग लागल्याचे दिसताच त्यांनी त्या दिशेने धाव घेतली. अनेकांना बाहेर पडण्यास त्यांनी मदत केली. मात्र त्याचवेळी त्यांच्या समोरच गॅस सिलेंडरचा स्फोट झाला त्यात ते जबर जखमी झाले. त्यातच आगीने प्रचंड धूर निर्माण झाल्याने त्यात गुदमरून त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती परिसरातील रहिवाशांनी दिली.

## विरार येथे सोनसाखळी चोरणाऱ्या ...

बातमीदार व तांत्रिक माहितीचे आधारे शोध घेत असतांना, सदरचा आरोपी हा भिवंडी-वाडा रोडवरील यशवंत ढाबा येथे येणार असल्याची बातमी मिळाली. सापळा रचुन शिताफतीने सराईत आरोपी अज्जु ऊर्फ अजगर खान (४३), मिराज अन्सारी (३३) आणि जमाल अन्सारी (३८) यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. आरोपींकडे चौकशी केल्यावर त्याचेकडून १ लाख १० हजारांची २० ग्रॅम सोन्याचे चेन हा मुद्देमाल हस्तगत करुन सदरचा गुन्हा उघडकीस आला आहे. सराईत आरोपी अज्जु याचेवर ९ गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली विरारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुशिलकुमार शिंदे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि ज्ञानेश फडतरे, पोलीस उपनिरीक्षक अविनाश हाटखिळे, पोलीस हवालदार सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, संदिप शेळके, मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार, नामदेव ढोणे व संतोष खेमनर यांनी केली आहे.

04 TO 10 MARCH 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 3/2/2024 9:52 PM Page 1



# 'जिथे कमी तिथे तुम्ही' प्रकाश निकम यांची अंगणवाडी सेविकांना शाबासकीची थाप



**पालघर/प्रतिनिधी**

कोरोना सारखे संकट असो, किंवा एखादी योजना राबविणे, यशस्वी करणे यामधे प्रत्येक ठिकाणी माझी अंगणवाडी ताई, पर्यवेक्षिका, मदतनीस ताई ही अग्रक्रमावर असते, असे सांगून जिथे कमी तिथे तुम्ही असे सांगून जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका आणि मदतनीस ताईंना शाबासकीची थाप दिली. आज दिनांक १/३/२०२४ रोजी जिल्हा परिषद पालघर येथे महिला व बाल विकास विभागामार्फत आदर्श अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका, अंगणवाडी मदतनीस पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की कुपोषण हा जिल्ह्याला लागलेला डाग आहे आणि हळूहळू कुपोषणाचा आकडा कमी होत आहे. डअच बालकांचा आकडा १०० खाली आणण्याचे ध्येय असून तुमच्या मदतीनेच हा डाग पुसण्याचे काम आज अंगणवाडी ताई करीत आहेत. आणि पुढे देखील करत राहतील. वर्षभर तुम्ही गावासाठी, समाजासाठी काम करत असता त्यामुळे तुमच्यावर कधीही कुठलेही संकट आले तरी जिल्हा परिषद कायम तुमच्या पाठीशी उभी असेल असा विश्वास यावेळी उपस्थित सेविका व ताईंना दिला. यावेळी एकूण ८३ अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका आणि मदतनीस यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यामध्ये मुख्य सेविका ११, अंगणवाडी सेविका प्रथम १२, द्वितीय १२, तृतीय १२ तर अंगणवाडी मदतनीस प्रथम १२, द्वितीय १२, तृतीय १२ असे एकूण ८३ पुरस्कार देण्यात आले. यात प्रथम क्रमांकासाठी ५ हजार रु, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह, द्वितीय ३ हजार रु, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांकासाठी प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. पुरस्काराची रक्कम थेट खात्यात जमा करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरस्कार प्राप्त सेविकचे अभिनंदन केले आणि जिल्हा परिषद मार्फत कुपोषण, स्थलांतर कमी करण्यासाठी जिल्हा परिषदमध्ये राबवत असलेल्या योजनांची माहिती दिली. उपाध्यक्ष पंकज कोरे यांनी तुम्ही करत असलेल्या कमापुढे हा पुरस्कार खूप लहान आहे, असे सांगून सेविकांच्या कामाचे कौतुक केले. सभापती रोहिणी शेलार यांनी आई नंतर मुलाचे पालकत्व स्वीकारणारी दुसरी आई म्हणजे अंगणवाडी ताई असते, त्यामुळे मुलांच्या संस्काराची जबाबदारी देखील तुमच्यावरच असते असे सांगून पुरस्कार प्राप्त सेविकांचे अभिनंदन केले.जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रवीण भावसार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. या पुरस्कार वितरणाबद्दल सर्व सन्मानित सेविका, पर्यवेक्षिका आणि मदतनीस यांनी जिल्हा परिषदेचे आभार व्यक्त केले. यावेळी समाजकल्याण समिती सभापती मनीषा निमकर, कृषी व पशूसंवर्धन समिती सभापती संदिप पावडे, महिला व बालकल्याण समिती चे सन्मा.सदस्य, सर्व विभाग प्रमुख, बाल विकास प्रकल्प अधिकारी, पत्रकार, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# डहाणू उपजिल्हा रुग्णालयात प्रसूती वॉर्डातील खाटेवर कोसळले प्लास्टर!

**डहाणू/प्रतिनिधी**



डहाणू उपजिल्हा रुग्णालयातील प्रसूती वॉर्डातील स्लॅबचे प्लास्टर रुग्णाच्या खाटेवर कोसळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. उपजिल्हा रुग्णालयाची इमारत जीर्ण झाल्यामुळे इमारतीच्या स्लॅबला ठिकठिकाणी तडे गेले असून त्यातूनच एका ठिकाणी शुक्रवार १ मार्च रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास प्लास्टर कोसळले आहे. सुदैवाने या खाटेवर रुग्ण नव्हता मात्र शेजारच्या खाटेवरील महिला थोडक्यात बचावली आहे. या घटनेमुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रुग्णालयात उपस्थित रुग्णांनी दिलेल्या माहितीनुसार सकाळी ९.३०च्या सुमारास अचानक स्लॅबचे प्लास्टर निखळून खाली पडले. सुदैवाने खाटेवर रुग्ण नसल्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. मात्र यामुळे रुग्णांच्या मनामध्ये भीती निर्माण झाली असून जीर्ण इमारतीत उपचार घेणे धोकादायक ठरत असल्याची माहिती त्यांनी दिली. याविषयी डहाणू उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी बालाजी हेंगणे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी दिलेल्या माहिती नुसार इमारत जीर्ण झाल्यामुळे इमारतीला ठिकठिकाणी तडे गेले आहेत. याविषयी सार्वजनिक बांधकाम उपविभाग डहाणू यांना वेळोवेळी सूचना देऊन सुधारणा करून घेण्यात येत आहेत. शुक्रवारी घडलेली घटना अनपेक्षित होती. याविषयी तत्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचित करण्यात आले असून दुरुस्ती करण्यात येणार आहे.

# भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी ठेकेदारासह दोघांना अटक

**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार येथील वाकणपाडा परिसरात गोदामाची भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी जागा मालक आणि ठेकेदारावर गुन्हा दाखल केला असून ठेकेदाराला अटक करण्यात आली आहे. या दुर्घटनेच्या निमित्ताने अनधिकृत बांधकामांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पालिकेच्या उदासिनतेमुळे ही अनधिकृत बांधकामे फोफावत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. नालासोपारा पूर्वेच्या वाकणपाडा येथील चौधरी कंपाऊंड मध्ये गोदामाचे काम सुरू होते. मंगळवारी संध्याकाळी गोदामाची भिंत कोसळून ५ मजूर जखमी झाले. त्यापैकी कल्पेश नडगे (१९) या मजुराचा मृत्यू झाला होता. जागा मालक आणि ठेकेदार यांनी कोणतीही सुरक्षेची साधने अंगारवर परिधान करण्यास न देता तसेच हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, बूट, हॅण्डग्लोज, सेफ्टीकोट आदी साहित्य पुरवले नव्हते. हलगर्जीपणाने न निष्काळजीपणाने मजुरांना ओल्या सिमेंट आणि विटांच्या भिंतीच्या बांधकामाचे काम करण्यास



लावले होते. याप्रकरणी जागा मालक हमीद, रफीक अहमद अब्दुल चौधरी आणि ठेकेदार लक्ष्मण बरफ यांच्यावर भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ३०४ (अ), ३३७, ३३८, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी आम्ही ठेकेदाराला अटक केली असून पुढील कारवाई सुरू असल्याची माहिती पेल्हार पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी दिली. वसई विरार परिसरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होते असून ते रोखण्यात पालिकेला अपयश येत आहे. पालिका अधिकाऱ्यांच्या संगनमतानेच ही बांधकामे फोफावर असल्याच आरोप आहे. पालिकेने तयार केलेले अनधिकृत बांधकाम नियंत्रण पथक देखील कारवाई करत नसल्याच्या तक्रारी आहेत. अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी पालिकेने विविध उपायायजोना सुरू केल्या होत्या. त्यामध्ये तीन ठिकाणी बीट चौक्या उभारून कर्मचारी नियुक्त केले होते. यामुळे अनधिकृत बांधकामांची माहिती सहाय्यक आयुक्तांकडून वरिष्ठांपर्यंत पोहोचवली जाईल आणि बांधकाम सुरू असतानाच पालिकेला कारवाई करणं शक्य होणार होतं. मात्र या बीट चौक्या ओस पडल्या आहेत. शनिवार रविवार या सुट्टीच्या दिवशी अनधिकृत बांधकामे होत असतात. त्यामुळे शनिवार- रविवारी या सुट्टीच्या दिवशी उपायुक्तांनी नेमून दिलेल्या प्रभागात जाऊन अनधिकृत बांधकामे होतात का त्याची पाहणी आणि जर अनधिकृत बांधकामे दिसली तर त्याची माहिती अनधिकृत बांधकाम विभागाच्या उपायुक्तांना द्यायची अशी योजना होती. सुरवातील उपायुक्तांनी पाहणी केली नंतर ही योजना देखील बारगळली.

# भिवंडीत दहा किलो गांजा जप्त, दोन महिन्यात १९ किलोचा गांजा शांतीनगर पोलिसांनी केला जप्त

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी शहरात मागील तीन महिन्यां पासून गांजा पिणाऱ्यांवरा शेकडो कारवाया केल्या जात आहेत तरी सुध्दा गांजा विकणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याची ओरड होत असतानाच शांतीनगर पोलिसांनी केलेल्या कारवाईत १० किलो ५०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करीत दोघा जणांना ताब्यात घेतले आहे. शांतीनगर हद्दीत दोन इसम गांजा विक्री साठी येत असल्याची माहिती शांतीनगर पोलिस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश घुगे यांना मिळाली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर इंदलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकातील कर्मचारी संतोष पवार, किरण जाधव, श्रीकांत पाटील, रोशन जाधव, रवींद्र पाटील, नरसिंह क्षीरसागर यांनी पाईप लाईन रोड पोगाव चौकी जवळ सापळा लावला असता त्याठिकाणी संशयित दोन इसम रिक्षा नंबर एम एच ०५ डीझेड ९३३५ मधून त्या ठिकाणी आले असता पोलिस पथकाने त्यांना ताब्यात घेत त्यांच्या रिक्षात १० किलो ५०० ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला. पोलिसांनी रिक्षा चालक गुलाब हुसेन इस्राईलमियाँ सलमानी (२२) व सादीकअली बहादुर खान (२७) दोघे रा.टिटवाळा रोड, बनेली गाव ता.कल्याण या दोघांना ताब्यात घेऊन २ लाख १० हजार रुपयांचा गांजा, रिक्षा व मोबाईल असा एकूण ३ लाख ४० हजार ७७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे २०२४ मध्ये शांतीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर इंदलकर यांच्या नेतृत्वाखाली मादक नशेचे पदार्थ विकणाऱ्यां विरोधात विशेष मोहीम सुरू केली ज्यामध्ये तीन गुन्ह्यात एकूण १९ किलो ६५० ग्रॅम वजनाचा ६ लाख ४ हजार २७० रुपये किमतीचा गांजा जप्त करीत आठ आरोपींना अटक केली आहे. तर अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ११२ व्यक्तीं विरोधात गुन्हे दाखल केले आहेत. यापुढे ही अमली पदार्थ विरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर इंदलकर यांनी दिली आहे.

# श्रेया विनायक जाधव कॉम्प्यूटर टायपिंग परीक्षेत घवघवीत यश

**पालघर/प्रतिनिधी**



कॉम्प्युटर टायपिंग परीक्षेमध्ये १०० पैकी ९९ गुण मिळवून पालघर ठाणे जिल्ह्यात प्रथम तर महाराष्ट्रात तिसरा क्रमांक पटकावला कू.श्रेया विनायक जाधव हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे कॉम्पुटर टायपिंग परीक्षेमध्ये १०० पैकी ९९ गुण मिळवले तर पालघर ठाणे जिल्ह्यात प्रथम तर महाराष्ट्रात तिसरा क्रमांक पटकावला आहे. जिल्ह्यात सर्वत्र कौतुक होत आहे असून राष्ट्रीय पँथर आघाडीचे पालघर जिल्ह्याचे अध्यक्ष विनायक नामदेव जाधव यांची जेष्ठ कन्या कुमारी श्रेया विनायक जाधव हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी घेतलेल्या व कॉम्पुटर टायपिंग परीक्षेत डिसेंबर २०२३ मध्ये १०० पैकी ९९ गुण मिळवून पालघर ठाणे जिल्ह्यात प्रथम तर महाराष्ट्रात तिसरा क्रमांक पटकावला आहे त्यामुळे पालघर जिल्ह्याचे नाव संपुर्ण महाराष्ट्रात उंचावले आहे. तिचा या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा सुध्दा मिळत आहेत.

# विज्ञान दिनानिमित्त अनुभूती निवासी स्कूलमध्ये उपयुक्त प्रोजेक्टचे सादरीकरण

**जळगाव/प्रतिनिधी**



अनुभूती निवासी स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त ५ वी ते ८ व्या इयत्तेसह सर्व विद्यार्थ्यांनी ३७ प्रोजेक्ट साकारले आहेत. समाज हितासाठी उपयुक्त असलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमानिमित्त स्वयंप्रेरणेतून प्रोजेक्टच्या संकल्पनांवर काम केले. यात विज्ञान, तंत्रज्ञान, आर्टिफिशीयल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, केमिस्ट्री, बायोलॉजी, भौतिकशास्त्र, अवकाश तंत्रज्ञान, रोबोटिक्स, थ्री डी प्रिंटींगसह अन्य विषयांवर प्रोजेक्ट साकारण्यात आले आहेत. अनुभूती निवासी स्कूलमधील असेंम्बली हॉलमध्ये हे प्रोजेक्ट ठेवण्यात आले आहे. त्याचे उद्घाटनाला जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन यांच्याहस्ते फित सोडून आणि दीपप्रज्वलनाद्वारे करण्यात आले. याप्रसंगी अनुभूती स्कूलचे अध्यक्ष तथा जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकिय संचालक अतुल जैन, संचालिका सौ. निशा जैन, प्राचार्य देबासिस दास, अभंग जैन उपस्थित होते. दोन दिवस होणाऱ्या या प्रोजेक्ट सादरीकरणात इतर शाळांसाठी सायन्स क्विझ' आयोजित केली आहे. अनुभूती निवासी स्कूलमध्ये 'अनुभूती इनोव्हेशन' सेंटर असून रोबोटिक लॅब सह आर्टिफियल तंत्रज्ञानासहन विद्यार्थामध्ये संशोधात्मक वृत्तीला चालना मिळावी यासाठी प्रयत्न केले जाते आहेत. वर्षभरात चांद्रयान-३, भूमिती व गणितीय प्रोजेक्ट, मायक्रोबॉयॉलाजी, मेडिकल टेक्नोलॉजी, इलेक्ट्रोमॅग्रेटीक लिफ्टचे उपकरण यासह विज्ञानावर आधारित विविध मॉडेल, प्रोजेक्ट शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली साकारतात. यात विद्यार्थी अत्याधुनिक विज्ञानावर आधारित उपकरणे, मॉडेल, प्रोजेक्ट तयार करत असतात.

यावर्षी ३७ निरनिराळ्या प्रकारचे विज्ञान प्रोजेक्ट साकारलेले आहेत. विशेष उल्लेखनीय असे की, ड्रोन टेक्नॉलॉजी, बायोफर्टिलायझर, बेसिक रोबोटिक्स, सोलर ट्रॅकिंग सिस्टीम्स, अंतराळ विज्ञान यांचा समावेश होता. यासोबतच पर्यावरण, माहिती तंत्रज्ञान, गणित, इंजिनेअरिंग, कॉम्प्युटर, रोबोटिक्स तंत्रज्ञानावर आधारित हे प्रोजेक्ट होते.

# पालिका प्रशासकीय कामाचा खोळंबा

**विरार/प्रतिनिधी**

वसई-विरार महापालिकेत गेली तीन वर्षे प्रशासकीय कारभार सुरु आहे. त्यामुळे प्रशासनाच्या लहरीवर लोकांची कामे होतात. पालिकेत लोकप्रतिनिधी नसल्याने पालिके विषयीच्या कामाची अपेक्षा कोणाकडून करायची? असा प्रश्न नागरीकांना पडला आहे. २०२० पासून पालिकेत प्रशासकीय कारभार सुरु आहे. सध्या महापालिका आयुक्त प्रशिक्षणासाठी मसुरी येथे महिनाभर गेले आहेत. ते २९ मार्च पर्यंत पालिकेत उपलब्ध असणार नाहीत. त्यामुळे प्रशासकीय कामांची व आर्थिक मंजुरीची कामे त्यांनीच करायची आहेत. अतिरीक्त आयुक्तांना आयुक्तांचे अधिकार असले तरी हे दोन कामाचे अधिकार नाहीत. वसई-विरार महानगरपालिका सध्या लोकसभेच्या निवडणुका कधी जाहीर होतात. याकडे लक्ष ठेवून आहेत. निवडणुका जाहीर झाल्यावर आय.ए.एस. अधिकाऱ्यांना निवडणुकीची जबाबदारी देऊन अन्यत्र पाठविण्यात येईल, अशीही शक्यता आहे. तेव्हा लोकांची एकूणच कामे होणार कशी हा प्रश्न आहे. १० मार्चनंतर आचारसंहिता लागणार आहे. त्यातच हा आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना आहे. विविध योजना व गरजू समाज घटकांना शासनाच्या लागू झालेल्या सवलती यांचा लाभ या काळात मिळणार नाही. त्यामुळे इथे पंतप्रधान नरेंद्र मोदींची गॅरंटी काही काम करेल का? नाहीतर पुढचे तीन महिने लोकांना प्रशासनाच्या हक्काच्या मदतीला वंचित रहावे लागेल.


# परदेशातून राहायला येणाऱ्या नागरिकांची माहिती पोलीस ठाण्याला देणे बंधनकारक




**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार व मीरा भाईंदर शहरात परदेशातील नागरिक राहण्यासाठी येऊ लागले आहेत. परंतु शहरात घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये बहुतांश अशा नागरिकांचा सहभाग आढळून येत आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी मीरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयाने परदेशातून येणाऱ्या नागरिकांना भाडेतत्वावर घर देताना त्यांची माहिती पोलीस ठाण्याला देणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबतचा मनाई आदेश परदेशातून राहायला येणाऱ्या नागरिकांची पोलिसांनी जारी केला आहे. वसई विरार व मीराभाईंदर शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढू लागले आहे. तर या शहरातील परिसरात स्वस्तात व भाडेतत्वावर घरे उपलब्ध होत असल्याने परदेशातील विविध ठिकाणच्या भागातून येऊन वास्तव्य करीत आहेत. परंतु याची कोणतीच अधिकृत माहिती पोलीस ठाण्याला नाही. त्यातच यातील काही नागरिक गुन्हेगारी, अंमली पदार्थ तस्करी व विविध प्रकारच्या फसवणुकीच्या गुन्ह्यात सहभाग आढळून येत आहे. यावर नियंत्रण मिळविण्यासाठी पोलिसांनी वसई- विरार मीरा भाईंदर शहरात १ मार्च पासून २८ एप्रिलपर्यंत फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१)(२) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. याआधी घरमालक पैशाच्या लालसेपोटी परदेशी नागरिकांची कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता त्याला भाडेतत्वावर घर देत होता. मात्र आता असे करता येणार नाही. मालकाला परदेशीनागरिकांना घर, दुकाने हॉटेल व जमीन भाड्याने देण्यापूर्वी त्यांची रीतसर भाडे करार करून २४ तासाच्या आत नजीकच्या पोलीस ठाण्यात माहिती दिल्याशिवाय भाड्याने देवू नये असे आदेश पोलिसांनी दिले आहेत. जे नियमांचे पालन करणार नाहीत अशावर कारवाई केली जाईल असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

# दुरुस्तीच्या कामामुळे मुंबई-अहमदाबाद महामार्ग बंद



**वसई/प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबाद महामार्ग आज दिवसभर वाहतूक कोंडीमुळे जाम झाला होता. त्यामुळे मुंबईहून घोडबंदर ते विरार या मार्गावर तासनतास वाहने ठप्प होती. विरारकडे जाणारी वाहने महामार्गावरच अडकल्याने खासगी वाहनातून मुंबईला विधी मंडळ अधिवेशनासाठी जाणारे आमदार हितेंद्र ठाकूर व क्षितीज ठाकूर यांनी वसईवरुन जलमार्गाने म्हणजे रो रो सेवेने भाईंदर गाठले व दहिसर चेक नाक्यावरुन ते चर्चगेटला रवाना झाले. या महामार्गावरुन २० ते २५ हजार वाहने दररोज ये-जा करतात. मात्र महामार्गावर पावसाळ्यानंतर रस्ते खराब असून अनेक वाहने रस्त्यात उभी केलेली असतात. रस्त्याच्या किनाऱ्याला मातीचे ढिगारे टाकलेले असतात. अनेक अतिक्रमणामुळे महामार्गाला आपला वेग साधता येत नाही. दररोज ठाणे, मुंबई व उपनगरात जाणारे हजारो वाहन चालक व्यवसायिक, उद्योजक व कर्मचारी या मार्गाने जातात. मात्र त्यांच्या वेळेचा खोळंबा महामार्ग नादुरुस्त असल्याने होत आहे. महामार्गाची दुरुस्ती सुरु असल्याने दोन्हीकडील वाहने महामार्गावरच तासनतास अडकून राहिली होती.


## NOTICE

Shri/Shrimati Geeta T. Lalwani al Member of the Mausam Cooperative Housing Society Ltd. having, address at Vishal Nagar, Behind Vartak College, Vasai Road(W.) and holding Flat/ tenement No. A101 in the Building of the Society, died on 06/11/2015 without making any nomination. The society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants/ objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/ property of the society within a period of days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/ property of the society. If no claims/objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/ property of the society in such manner as is provide under the bye-laws of the society. The claims/ objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society/ with the secretory of the society between 06.00 P. M. to 08.00 P. M. within 15 days from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

For and on behalf of
**The Mausam Co-op. Housing Society Ltd.**
Sd/-
Hon. Secretary

Place: Vasai Road (W.)
Date: 03/03/2024

# संकेत भोसले हत्या प्रकरणी न्याय मागणीसाठी एल्गार मोर्चा



**भिवंडी/प्रतिनिधी**

धक्का लागल्याच्या शुल्लक वादातुन दलित तरुणाचे अपहरण करून त्याला अमानुष मारहाण केल्याने या मारहाणीत संकेत भोसले या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.या घटनेने शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी रिपब्लिकन नेते ऍड.किरण चन्ने यांच्या नेतृत्वाखाली न्याय मागणी एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महाराजांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून हा मोर्चा काढण्यात आला.या मोर्चात आरपीआय सेक्युलरचे राष्ट्रीय अध्यक्ष श्याम दादा गायकवाड,पिंपरी चिंचवडचे आंबेडकरी कार्यकर्ते साकी गायकवाड, अहमदनगर येथील प्रदीप थोरात, कॉम्रेड अँड. उदय चौधरी, रवींद्र चौधरी, राहुल सोळंखी, सुमित्र कांबळे, शाहूराज साठे, अँड.दिलीप वाळंज, रवींद्र चंदणे यांच्यासह भिवंडीसह ठाणे, पालघर, पुणे व अहमद नगर येथील आंबेडकर अनुयायांसह पीडित संकेत भोसले यांचे कुटुंबीय या मोर्चात सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून वंजारपट्टी नाका मार्गे भिवंडी प्रांत अधिकारी कार्यालय येथे या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. आपल्या मागण्यांचे निवेदन पीडित संकेत भोसले यांच्या आईसह मोर्चाचे आयोजक किरण चन्ने हे प्रांताधिकारी कार्यालयात घेऊन गेले असता भिवंडी प्रांताधिकारी अमित सानप हे कार्यालयात उपस्थित नसल्याने आंदोलनकर्त्यांचा राग अनावर होत चन्ने यांनी प्रांत अधिकाऱ्यां विरोधात घोषणाबाजी करत निवेदन देण्यास नकार दिला. त्यांनतर आपल्या मागण्यांचे निवेदन भिवंडी पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांच्याकडे दिले. मयत संकेत भोसले यांच्या आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, फरार सर्व ...पान ६ वर

# सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी नागरिकांनी इंटरनेटच्या वाढत्या वापरात स्वत:ला सजग ठेवणे आवश्यक -प्रा.विकास नाईक



**लातूर/प्रतिनिधी**

आज मोबाईल-इंटरनेटचा वापर न करणारी व्यक्ती दिसणार नाही, असे कदापि होऊ शकत नाही. इंटरनेटच्या वाढत्या वापराने व्यक्ती नकळतपणे सायबर गुन्ह्यात अडकू शकते. त्याकरिता सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी नागरिकांनी स्वतःला सजग ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, नव्हे तर ती काळाची गरज आहे असे प्रतिपादन नाशिकचे सायबर लॉ तज्ज्ञ प्रा. विकास नाईक यांनी केले.महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स संघटनेच्या स्टडी सर्कलचे (कायदेविषयक माहिती) उद्घाटन गुरुवारी सकाळी दयानंद सभागृहात ऑल इंडिया फेडरेशन ऑफ वुमेन लॉयर्सच्या उपाध्यक्षा ॲड. जयश्री अकोलकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड. अण्णाराव पाटील हे होते. यावेळी ऑल इंडिया फेडरेशन ऑफ वुमेन लॉयर्सच्या उपाध्यक्षा ॲड.जयश्री अकोलकर, फेडरेशनच्या माजी अध्यक्षा ॲड. निलिमा वर्तक, ॲड.बळवंत जाधव, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स संघटनेच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील, पोलीस नियंत्रण कक्षातील सायबर सेलच्या पोलीस निरीक्षक नलिनी गावंडे, लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. महेश बामणकर, दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या पूनम नाथानी, ॲड. विद्या कोसमकर, ॲड. कांचन कांदे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्स, दयानंद विधी महाविद्यालय आणि लातूर जिल्हा वकील मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. नाशिकचे सायबर लॉ तज्ज्ञ प्रा. विकास नाईक यांनी यावेळी 'सायबर सेक्युरीटी' या विषयावर अत्यंत विस्तृत असे मार्गदर्शन केले. इंटरनेटसोबत जगणे जेवढे सहज, सोपे आहे तेवढेच या माध्यमातून बदनामीही होण्याची शक्यता अधिक असल्याचे सांगून प्रा. विकास नाईक पुढे म्हणाले की, पूर्वी चोरी, दरोड्यासारखे गुन्हे घडायचे. आता बदलत्या काळात सायबर गुन्हेगार आपला संगणक, ...पान ६ वर

# वाड्यातील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर आणि कनिष्ठ महाविद्यालय तंबाखुमुक्त शाळा म्हणून घोषित




**वाडा/प्रतिनीधी**

पालघर जिल्ह्यातील वाडा पंचायत समिती अंतर्गत शिक्षक संचालित शिक्षण संस्थेच्या स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, वाडा शाळेने तंबाखुमुक्त अभियानाचे सर्व ९ निकष पूर्ण करण्यात आली म्हणून सलाम मुंबई फाउंडेशनचे प्रतिनिधी, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याचे पालघर जिल्हा संघटक मिलिंद रूपचंद पाटील यांनी तंबाखुमुक्त शाळा म्हणुन जिल्हा परिषद शाळा स्वामी विवेकानंद विद्या मंदिर वाडा व कनिष्ठ महाविद्यालय वाडा तालुका वाडा जिल्हा पालघर शाळेला घोषित केले आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभाग पालघर, तंबाखू नियंत्रण उपक्रम कार्यक्रम, सलाम मुंबई फाउंडेशन व नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा, खाजगी शाळा, महाविद्यालयात तंबाखुमुक्त अभियान राबविण्यात आले आहे. वाडा तालुक्यातील पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मोकाशी साहेब यांनी सूचना केली होती.त्यानुसार स्वामी विवेकानंद ...पान ६ वर

# बाळासाहेब थोरात व राहुल गांधीच्या भारत जोडो न्याय यात्रेचा भिवंडीत होणार मुक्काम

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभेत काँग्रेस उमेदवार हमखास विजयी होऊ शकतो म्हणून काँग्रेस या जागेवर दावा करीत असल्याचे काँग्रेस नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट केले. ते ते मुंबई नाशिक महामार्गावरील भिवंडी ठाणे बायपास रस्त्यावरील सोनाळे ग्रामपंचायत हद्दीतील क्रीडांगण याची पाहणी करण्याकरीता आले होते. यावेळी त्यांच्या सोबत युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस विरेन दयानंद चोरघे, भिवंडी शहर अध्यक्ष रशीद ताहीर मोमीन, जिल्हा सरचिटणीस पंकज गायकवाड, भिवंडी तालुकाध्यक्ष विजय पाटील, मुरबाड तालुकाध्यक्ष चेतन पवार यांसह काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्रातील लोकसभेच्या जागा वाटपाचा महाविकास आघाडीतील तिढा अजून सुटत नसून त्यामध्ये भिवंडी लोकसभा कळीचा मुद्दा ठरत आहे यावर विचारले असता ते बोलत



होते. भिवंडी लोकसभेवर काँग्रेस शिवाय राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांनी दावा केला आहे. चार ते पाच जागांवर चर्चा सुरू असल्याचे कबूल करीत तीन पक्ष असल्याने प्रत्येकजण दावा करीत आहे. त्यामध्ये इलेक्टिव्ह मेरिट महत्वाचे आहे. कोणाला किती जागा वाट्याला येतील यापेक्षा कोण कोठे निवडून येईल ही बाब तपासून त्यावर भर दिला आहे. त्यामुळे आमचा आग्रह भिवंडी लोकसभा काँग्रेसला मिळावी असा आहे असे बाळासाहेब थोरात यांनी निक्षून सांगितले. राहुल गांधी यांची पूर्व ते पश्चिम दिशेने निघालेली भारत जोडो न्याय यात्रा १२ मार्च रोजी महाराष्ट्रात नंदुरबार जिल्ह्यात प्रवेश करत आहे तेथून त्यांची यात्रा मुंबईच्या दिशेने जात असताना १५ मार्च रोजी त्यांचा मुक्काम भिवंडी येथे असणार आहे अशी माहिती काँग्रेस नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे. राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय ...पान ६ वर

# भिवंडीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची लोकसभेची मोर्चे बांधणी




**भिवंडी/प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीत भिवंडी लोकसभा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने लढविण्यात येणार असल्याचे संकेत दिसत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष लोकसभेत सक्रिय झाला असून गुरुवारी कोनगाव येथे युवक आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी राष्ट्रवादीचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, भिवंडी लोकसभा प्रभारी सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा, विभागीय अध्यक्ष विद्याताई वेखंडे, ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा डॉ.रूपाली अमोल कराळे, तालुकाध्यक्ष गणेश गुळवी यांच्यासह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आगामी लोकसभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी आल्यास संपूर्ण लोकसभेत राजकीय रणनीती आखण्या संदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली असून युवकांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी दिल्या असून मेहबूब शेख यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत युवकांनी संपूर्ण ताकदीनिशी काम करण्याच्या सूचना दिल्या.

# जैन चॅलेंज चषक तायक्कांडो स्पर्धेत खेळाडूंकडून पदकांची कमाई

**प्रथम पहुरची सावित्रीबाई फुले शाळा, द्वितीय ऐनपूरची सरदार पटेल विद्यालय तर तृतीय जळगावची अनुभूती निवासी स्कूल विजयी**

**जळगाव/प्रतिनिधी**

पहिल्या जैन चॅलेंज तायक्कांडो स्पर्धेचे आयोजन २५ फेब्रुवारीला केले होते या स्पर्धा अनुभूती इंटरनॅशनल निवासी स्कूलमधील बॅडमिंटन हॉल येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेत रावेर, जामनेर, जळगाव, शिरसोली, पाचोरा, चाळीसगाव येथील विविध शाळेतील १६० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. तायक्कांडो स्पर्धेत सावित्रीबाई फुले माध्यमिक शाळा पहुर प्रथम, सरदार वल्लभ भाई पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ऐनपुर ता. रावेर द्वितीय क्रमांक तर अनुभूती इंटरनॅशनल निवासी स्कूल यांनी तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेचे उद्घाटन बास्केटबॉल राष्ट्रीय खेळाडू व जळगाव जिल्हा तायक्कांडो असोसिएशनचे सहसचिव रवींद्र धर्माधिकारी यांच्या हस्ते झाले होते. पारितोषीक वितरण अनुभूती निवासी स्कूलच्या संचालिका सौ. निशा जैन यांच्याहस्ते झाले. यावेळी खेळाडूंना पदकं व बेस्ट फायटर तसेच विजेत्यांना चषक देण्यात आले. स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू



पुढीलप्रमाणे – मुलींच्या गटात – १६ किलो आतील दिशा सोनवणे, १८ किलो विधी कल्याणकार, २० किलो आतील मानसी करांडे, २२ किलो आतील दिशा रणसिंग, २४ किलो आतील वैष्णवी इंगळे, २६ किलो आतील मोहिनी राऊत, २९ किलो आतील नेहा बनकर, ३२ किलो आतील खुषी बारी, ३५ किलो आतील साची पाटील, ३८ किलो आतील अनुभूती चौधरी, ३८ किलो वरील स्वाती चौधरी विजयी झालेत.

मुलांच्या गटात – १८ किलो जियांश जोशी, २१ किलो आतील निभय लोखंडे, २३ किलो आतील आर्यन वानखेडे, २५ किलो आतील रोशन भवरे, २७ किलो आतील आर्यन गाढे, २९ किलो आतील गुरू कारंडे, ३२ किलो आतील भावेश निकम, ३५ किलो आतील कार्तिक पाटील, ३८ किलो अर्थव सोनार, ४१ किलो आतील हार्दिक जैन, ४१ किलो वरील अमर शिवलकर विजयी झालेत. ...पान ६ वर

# आ.कराड यांच्या प्रयत्नातून पानगावच्या हेमाडपंथी विठ्ठल मंदिरास साडेनऊ कोटी रुपयाचा निधी मंजूर

**रेणापूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील पानगाव येथील ऐतिहासिक व पुरातन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जतन व दुरुस्ती कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून ९ कोटी ३४ लक्ष ४९ हजार रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास राज्यातील महायुती शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य मंत्रालयाने १ मार्च २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार मान्यता दिली आहे. विठ्ठल मंदिरास निधी मिळवून दिल्याबद्दल मंदिर ट्रस्टसह पानगाव आणि परिसरातील भाविक भक्तांनी त्याचबरोबर भाजपाच्या लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांनी आ. कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत. पानगाव येथील श्री. विठ्ठल रूक्मीणी हे मंदिर उत्तर चालुक्य कालीन १२-१३ व्या शतकातील असावे. या



मंदिरावर होयसळ, चालुक्य आणि काकतीय यांच्या कालखंडातील स्थापत्य कलेचा प्रभाव दिसून येतो. मंदिरतील सभामंडप आणि गर्भगृह हेमाडपंथी स्थापत्य शैलीचे दिसून येते. सभामंडपात कलात्मक स्तंभाची रचना असून मंदिराच्या बाह्य भागात भौमितीक नक्षीकाम तसेच देवदेवतांची शिल्पे कोरलेली दिसून येतात अशा या श्री. विठ्ठल रूक्मीणी मंदिराचे जतन व्हावे, या मंदिराचा सर्वांगीन विकास व्हावा याकरीता भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांची मंदिर ट्रस्ट पदाधिकारी व पानगाव येथील सर्वपक्षीय शिष्टमंडळाने भेट घेऊन मागणी केली होती. यावेळी आ. कराड यांनी संरक्षित स्मारक दर्जा बरोबरच मंदिराच्या सर्वांगीण जिर्णोदरासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू शासनाच्या माध्यमातून कोट्यावधीचा निधी मिळवून देऊ अशी ग्वाही दिली होती. राज्याचे पर्यटन व सांस्कृतिक कार्यमंत्री ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार आणि पर्यटन विभाग, पुरातन विभाग यांच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पानगाव येथील हेमाडपंथी विठ्ठल मंदिराच्या वास्तूची माहिती देऊन या मंदिराचे जतन व्हावे आणि ...पान ६ वर

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अंतरंग कलामहोत्सव साजरा




**वसई/प्रतिनिधी**

डॉ. म.ग.परुळेकर मित्रमंडळ माजी विद्यार्थी यांचा दि.२४ आणि २५ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अंतरंग २०२४ हा कलामहोत्सव डॉ. म.ग. परुळेकर मित्रमंडळ शाळा, वसई गाव या शाळेच्या आनंदात साजरा झाला. मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्याचे यावर्षी माजी विद्यार्थी संघाचे चौथे वर्ष होते. एक विशेष बाब म्हणजे या कला महोत्सवसवाची संपूर्ण सजावट ही शाळेच्या माजी विद्यार्थिनी टाकाऊ वस्तूंपासून केली होती. या महोत्सवामध्ये चित्र प्रदर्शन कला निगडित कार्यशाळा तसेच व्याख्यान काव्यवाचक आणि शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पहिल्या दिवशी म्हणजेच २४ फेब्रुवारीला महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनाला चित्रकार सुभाष गोंधळे व बोईसर विधानसभेचे आमदार राजेश पाटील साहेब हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सुभाष गोंधळे यांच्या चित्र प्रदर्शनातून सर्वांना जुन्या वसईची आठवण झाली. या महोत्सवात एकूण चार कार्यशाळा घेण्यात ज्यामध्ये सुजाता निगडे यांनी देवनागरी भाषेत Calligraphy हा विषय घेतला. तर सई चुरमुरे यांनी डींपश पेंटींग या विषयावर कार्यशाळा घेतली. Clay Modelling या विषयासाठी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स मधून उत्तीर्ण झालेले शिल्पकार मंगेश कार्लेकर हे या मोहित्सवासाठी वसईत आले होते. ...पान ६ वर

# भाईंदर येथे भंयकर अग्नितांडव; एकाचा मृत्यू तर सहा जण जखमी



**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

भाईंदर पूर्व येथील आझाद नगर झोपडपट्टीला पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. आगीत दीपक ऊर्फ पपू चौरसिया यांचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले. जखमींमध्ये दोन लहान मुले व तीन अग्निशमन दलाच्या जवानांचा समावेश आहे. आगीची तीव्रता एवढी होती की निर्माण झालेला धूर एक ते दीड किलोमीटर अंतरापर्यंत पसरला होता. अग्नीशमन दलाने सुमारे तीन तास अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले परंतू परिसरात प्लास्टिक व बांबूची गोदामे असल्याने आग पूर्णपणे विझवण्यास बराच कालावधी लागला. आझादनगर परिसरात शेकडो अनधिकृत झोपड्या आहेत, त्यात काही कच्च्या व काही पक्क्या स्वरूपातील आहेत. शिवाय भंगार, प्लास्टिक व बांबूची गोदामे देखील ...पान ६ वर

# विरार येथे सोनसाखळी चोरणाऱ्या त्रिकुटाला अटक



**विरार/प्रतिनिधी**

सोनसाखळी चोरी करणाऱ्या सराईत तीन आरोपींच्या त्रिकुटाला अटक करण्यात विरारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश मिळाल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी मंगळवारी दिली आहे. फुलपाडा रोडवरील श्री अष्टविनायक गृह बिल्डिंगमध्ये राहणारे वासुदेव म्हात्रे (६४) यांच्या गळ्यातून सोन्याची चेन खेचून नेल्याची घटना २१ फेब्रुवारीला रात्री घडली होती. ते मुलाच्या लग्नाची पत्रिका देण्यासाठी फुलपाडा ते मनवेलपाडा रोडवर पायी चालत होते. त्यावेळी निदान लॅब समोरील रोडवर आरोपीने त्यांच्या गुप्तांगावर गुडघ्याने मारले. त्यांच्या गळ्यातील १ लाख १० हजारांची २० ग्रॅमची सोन्याची चेन आरोपीने झटापटी करून बळजबरीने काढून घेऊन दुचाकीने पळून गेला होता. याप्रकरणी विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांनुसार विरारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी भेट देत तेथील सीसीटीव्ही फुटेज आणि आरोपींची एमओबीच्या आधारे हा गुन्हा आरोपी अज्जु ऊर्फ अजगर खान यानेच केला असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचा भिवंडी परिसरात ...पान ६ वर